# प्रकरण - ४

## भूदान प्राप्ती व जमीन वाटप पद्धती

'भूदान' चळवळीच्या काळात भूदान प्राप्ती आणि भू-वाटप हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. भू प्राप्ती होण्यासाठी विनोबा आणि त्यांचे कार्यकर्ते सुरुवातीच्या काळात स्वयंस्फूर्त पद्धतीने प्रयत्न करीत होते. चळवळीला विशाल स्वरूप प्राप्त झाल्यानंतर यात बदल झाला.

महाराष्ट्रात 'भूदान' ची सर्व व्यवस्था विनोबांनी महाराष्ट्र सेवा संघ (म. से. सं) यांच्याकडे सोपविली होती. या कामासाठी विनोबांनी पुढील समिती[१] नेमली होती. सर्वश्री अप्पासाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, श्रीधर महादेव तथा एस. एम. जोशी, श्री. भाऊसाहेब फिरोदिया, डॉ. रा. ना. दातार, श्री. शामराव पाटील, श्री. स्वामी सहजानंद भारती यांचा या समितीत समावेश होता.[२] या समितीने भूदान कार्याची तयारी व्हावी म्हणून एक सर्वेक्षण प्रश्नावली तयार केली.

भूदान यज्ञांकरिता प्रश्नावली[३]

''सबंध महाराष्ट्रात एक लाख एकर जमीन[४] भूदान यज्ञार्थ मिळवायची आहे. या कामात आंधळेपणा न ठेवता डोळसपणा ठेवला तर यज्ञाचे वातावरण झपाट्याने पसरण्याला मदत होईल. जे कार्यकर्ते या कामाला लागले आहेत किंवा जे लागणार आहेत. त्यांना आपल्या भोवतालच्या परिस्थितीचे ज्ञान आपल्या हाती घेतलेल्या कामाच्या दृष्टीने असणे आवश्यक आहे, म्हणून खाली दिलेली प्रश्नावली तयार केली आहे. कार्यकर्ते आपल्या सवडीप्रमाणे जर आपल्या आजूबाजूच्या खेड्यातून हिंडले, सरकारी दप्तरांतून त्यांनी माहिती घेतली तर भूदान-यज्ञ कार्याची आखणी करण्याला पुढे सोपे जाईल. जाणत्या विद्यार्थ्यांनाही हे काम सवडीने करता येण्यासारखे आहे. मात्र ही माहिती बिनचूक असावी. प्रश्न समजून घेऊन माहिती मिळविलेली असावी. या माहितीच्या दोन प्रती करून एक प्रत 'महाराष्ट्र सेवा संघाच्या' पत्त्यावर पाठवून द्यावी. तिचा महाराष्ट्राच्या भूदान-यज्ञ-समितीला फार उपयोग आहे. ज्या संघटनांच्या शाखा महाराष्ट्रभर पसरलेल्या आहेत. उदा. कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, मुंबई सरकारची सर्वोदय केंद्रे इ. त्यांनी आणि विधायक संस्थांचे तसेच स्वतंत्र विधायक कार्यकर्ते, सर्वोदय-समाजाचे व कताई मंडळाचे सभासद, अशांनी हे आपले काम समजून ते शक्य तितक्या लवकर पूर्ण करावे अशी विनंती आहे. या कामी ठिकठिकाणच्या काम करणाऱ्यांनी संघटितपणा आणला तर काम व्यवस्थित व एकसुत्री होईल. जिल्हा-तालुक्याची माहिती स्वतंत्र व प्रत्येक गावची स्वतंत्र द्यावयाची आहे. त्यानुसार पुढील प्रश्नावली भरून द्यावी.

## जिल्हा-तालुकावार माहिती

१) लोकसंख्या-(१९५१ च्या खानेसुमारीप्रमाणे)

अ) सबंध जिल्ह्याची

आ) प्रत्येक तालुक्याची. (नाव निशीवार)

इ) एकूण खेड्यात राहणारी लोकसंख्या

ई) शहरवासी लोकसंख्या

उ) शेतीच्या व्यवसायात गुंतलेल्यांची लोकसंख्या

ऊ) दर चौरस मैलास लोकसंख्या

२) जमीन[५]-

अ) जिल्ह्याचे एकूण क्षेत्र चौरस मैल किंवा एकर

आ) शेतीखालची जमीन

इ) अंदाजे पडीक जमीन क्षेत्र एकर

ई) दरसाल पड राहणारी जमीन अंदाजे क्षेत्र एकर

३) जमीन नसलेल्या लोकांचे प्रमाण[६]-

अ) एकूण लोकसंख्येशी

आ) जमीन असलेल्या लोकांच्या एकूण संख्येशी

४) अ) जिल्ह्यात/तालुक्यात १०० एकरांपेक्षा अधिक क्षेत्रांचे मालक असलेल्यांची संख्या आणि त्यांचे एकंदर खातेदारांशी प्रमाण.

आ) सर्वात मोठ्या खात्याचे क्षेत्र एकर (तपशीलासह)

इ) प्रत्येकी १०० एकरांहून अधिक जमिनीची मालकी असणाऱ्यांच्या हाती लागवडीखालील क्षेत्र किती एकर

५) अ) जिल्हा/तालुक्यामध्ये सरासरी खाते (holding) किती एकरांचे आहे.

आ) सर्वात लहान खाते किती क्षेत्राचे आहे.

६) जिल्ह्या/तालुक्यामध्ये मोठी भांडवलदारी पद्धतीची शेते आहेत काय. त्यांचे क्षेत्र एकर, मालकी, ठिकाण शेतमजुरीचे प्रमाण इ. तपशीलवार माहिती द्यावी.

७) जिल्ह्या/तालुक्यामध्ये मोठे जमीन मालक 'स्वतः कसणारे' म्हणून सरकारी कागदपत्राला किती लागले आहेत, कुळांना[७] खंडाने अगर भागाने देणारे किती लागले आहेत. (शक्यतो तपशील द्यावा.)

८) तुम्ही तुमच्या स्वतःच्या जमिनीपैकी काही जमीन भूदान-यज्ञात अर्पण केली आहे काय; केली असल्यास केव्हा व किती?

### गाववार माहिती पत्रक

जिल्हा....                    तालुका....

(लोकसंख्या १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणे द्यावी.)

१) गावाचे नाव                    २) लोकसंख्या

३) एकूण क्षेत्र चौरस मैल किंवा एकर.                    ४) शेतीखालची जमीन एकूण एकर.

५) पड जमीन एकूण एकर.                    ६) शेतीच्या व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या.

७) बिगरशेती लोकसंख्या

८) अ) एकूण खातेदार (शेतकरी) संख्या.

आ) स्वतः कसणारे खातेदार किती, खंडाने लावणारे किती.

९) गैरहजर (absentee) जमीन-मालक[८] किती.

१०) जमीन मुळीच नसलेल्या लोकांची संख्या.

११) १०० एकर व त्यावरील जमीन मालक किती.

५० एकर व त्यावरील जमीन मालक किती.

२५ एकर व त्यावरील जमीन मालक किती.

१० एकर व त्यावरील जमीन मालक किती.

५ एकर व त्यावरील जमीन मालक किती.

५ एकरापर्यंतचे जमीनमालक किती.

(५० एकरांवरील जमीन मालकांची नावनिशीवार यादी शक्य तर द्यावी.)

१२) अ) गावात सरासरी खाते (holding)[९] किती एकरांचे आहे.

आ) सर्वात लहान खाते किती क्षेत्राचे[१०] आहे.''

केवळ सर्वेक्षण प्रश्नावली पाठवून फारसे काही साध्य होणार नाही, म्हणून समितीने भूदान कार्यकर्त्यांसाठी स्वतंत्र नियमावली तयार केली.

### भूदान कार्यकर्त्यांसाठी नियमावली[११]

१) ''एक षष्ठांश[१२] या हिस्सेसरशीने गावच्या भूमिहीनांच्या गरजेच्या दृष्टीने गाववार जमीन किती उपलब्ध आहे. किती मिळावयाला पाहिजे, किती मिळाली आहे, मोठे लोक कोण आहेत, यासंबंधीची गाववार माहिती मिळविणे.

२) प्रत्येक गावाला भूहीनांच्या करिता किती जमीन आवश्यक आहे हे समजून घेण्याकरिता ज्या गावात पूर्वी काही जागृती झाली असेल आणि जेथे जमीनही मिळाली असेल, तेथे भूहीनांच्या सभा, ही करता येतील आणि त्यांची मागणी गाववाल्यांपुढे मांडता येईल. यामध्ये वर्गभावनेला उत्तेजन देण्याचा प्रश्न नाही, तर हिशेबाने गावाचे काम करणे आहे. गावाची समस्या गाववाल्यांना समजून देणे हा विचार त्यामागे आहे.

३) विचार-प्रचाराची योजना - प्रत्येक गावात 'भूदान-यज्ञ' साप्ताहिकाचा एक तरी ग्राहक असावा. त्याने ते स्वतः वाचावे. आणि आठवड्यातून एक वेळ गावची सभा करून सर्वांना वाचून दाखवावे. इतर सर्वोदय साहित्यही प्रत्येक गावात वाचले जाईल अशी सुद्धा योजना करावी.

४) दानपत्रांची इष्टसंख्या पूर्ण करणे : विचार समजून घेतल्याशिवाय दान घ्यावयाचे नाही. धाकदपटशा दाखवण्याची सक्त मनाई आहे. दान लिहून घेणाऱ्याचीही सही दानपत्रावर असली पाहिजे.

५) जुनी दानपत्रे पूर्ण करून घेणे.

६) ज्यांचा मोठ्या लोकांशी प्रेमसंबंध आहे, किंवा त्यांच्यावर ज्यांचे नैतिक वजन आहे अशा व्यक्तींच्या मार्फत मोठ्या लोकांकडे जाण्याची योजना बनविणे. जेथे विनोबांच्या पत्राची गरज असेल तेथे ते ही मिळू शकेल.

७) सर्व पक्षांच्या आणि अपक्ष कार्यकर्त्यांचे पूर्ण सहकार्य मिळविणे :- ज्याच्याकडून जेवढे म्हणून काम मिळेल त्याच्याकडून तेवढे संतोषपूर्वक घेतले पाहिजे. ज्याच्याकडून काम मिळणार नाही त्याची निंदा करता कामा नये. सर्वांचा मान वाढविणे, सर्वांची प्रतिष्ठा राखणे, सर्वांमध्ये सौमनस्य (भलमनसाई) स्थापित करणे हेच आमचे अभिष्ट आहे.

८) विनोबा (अथवा महाराष्ट्राच्या दृष्टीने बोलायचे झाले तर कोणी मोठे कार्यकर्ते) गावात गेले असता त्यांचे विशेष व्यक्तींशी अलग अलग बोलणे करणे सुद्धा अवश्यक आहे. ज्यांच्याशी बोलावयाचे त्यांचे नाव, उद्योग इ. च्या बाबतीत संक्षिप्त माहिती अगोदर मिळवून दिली जावी. त्यायोगे ज्ञानपूर्वक बोलणे होऊ शकते.

९) आघाडीला तयारीकरिता एखाद्या टोळीने काम करावे. तसेच मोठ्या कार्यकर्त्यांच्या आगमनानंतर त्यांनी निर्माण केलेल्या वातावरणाचा लाभ घेऊन दान वगैरेच्या दृष्टीने काम करणारी दुसरी टोळी असावी.

१०) ठिकठिकाणी लहान लहान शिबिरे चालविणे.[१३] ही शिबिरे ३ दिवसांपेक्षा जास्त दिवसांची असू नयेत. शिबिर होताच कार्यकर्त्यांना लगेच कामावर पाठवले पाहिजे. कार्यकर्त्यांना त्यांच्या शक्तिप्रमाणे साहित्य विकणे, विचार-प्रचार करणे, संदेश पोचविणे, दानपत्रासंबंधी आवश्यक ते सात-बारासारखे[१४]

उतारे पूर्ण करून घेणे आणि इतर व्यवस्था अशांसारख्या अनेक कामांना त्यांना लावता येईल. जमीन मिळवण्याचे काम तर आहेच.

११) सर्व ठिकाणी खादी केंद्रे वेगाने स्थापन झाली पाहिजेत. भूदान-यज्ञ प्रचारासाठी खादी केंद्रापासून अपेक्षा नाही. परंतु भूदान यज्ञ आणि खादी ग्रामोद्योग ही दोन्ही एकाच समग्र विचाराची अंगे असल्यामुळे खादी केंद्र योजनेने भूदानाच्या कामाला सहजच बळ मिळेल. खादीबरोबरच साहित्यप्रचार गावच्या लोकांत सहज होऊ शकेल, झाला पाहिजे.

१२) स्त्रियांच्या शक्तिचा विशेष उपयोग झाला पाहिजे. स्त्रियांची शक्ती जागवणे हे एक स्वतंत्र कार्यच आहे. आणि भूदानाकरिता ते आवश्यक आहे.

१३) विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याद्वारा विशेषतः साहित्य प्रचाराचे काम होऊ शकते. साहित्याच्या अभ्यासाकरिता त्यांची अभ्यासमंडळे काढता येतील. जनहितकारी आंदोलनात साहित्यिकांचेही काही एक विशिष्ट स्थान असते. त्यांची सहानुभूती आणि सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला जावा, 'भूदान-यज्ञ' साप्ताहिकात त्यांच्या कृतींना उचित स्थान मिळू शकेल.

१४) व्यापारी, वकील, डॉक्टर इ. भिन्न भिन्न वर्गात प्रवेश करण्याची योजना आखली पाहिजे.

१५) भूदान यज्ञात जो शांतिमय विचार निहीत व अभिप्रेत आहे, तो समजावून देऊन याच कामाकडे आपला जास्तीत जास्त वेळ, चिंतन आणि शक्ती देण्याचा संकल्प करणाऱ्या सेवकांची एक सेना तयार करावयाची आहे.

१६) कार्यकर्त्यांनी कोणाच्याही मागे कोणाच्या दोषांची चर्चा किंवा निंदा न करण्याचे व्रतच घेतले पाहिजे. कमिटीत सारा कार्यक्रम सुव्यवस्थित असला पाहिजे. पत्रांची उत्तरे वेळेवर गेली पाहिजेत. रोजचा हिशेब पूर्ण करूनच रात्री झोप घेतली पाहिजे. प्रार्थना व्हावी आणि ती यांत्रिक नसावी. मंगलप्रभात, गीताप्रवचन, स्थितप्रज्ञ दर्शन, ईशावास्य, उपनिषद इ. चे पठण, मनन हे कार्यकर्त्यांच्या प्रार्थनेचे अंग असावे.

'करेंगे या मरेंगे' हा संकल्प बापूंनी आम्हाला शिकविला आहे. बापू स्वतः तो पूर्ण करून निघून गेले. आता आम्हाला तो करावयाचा आहे. हे ध्यानी बाळगून आम्ही आपल्या सर्वस्वाची बाजी या कार्यात लावावयाची आहे.'' नुसती नियमावली करूनही फारसे काही साध्य होणार नाही म्हणून पुढील मार्गदर्शक सूचना[१५] केलेल्या आढळतात.

''प्रचाराचे काम चालू असताना कोणी जमीन दान देण्याची इच्छा प्रकट केली तर दानपत्र श्री. विनोबांच्या नावाने लिहून घ्यावे. दानपत्राचे फॉर्म्स प्रत्येक समितीकडे वा कार्यकर्त्यांकडे पाठविण्याची व्यवस्था करीत आहे. त्या प्रत्येक दानपत्राच्या दोन प्रती केलेल्या असाव्या. दोन्ही म. से. संघाकडे

पाठवायच्या आहेत, कारण, त्यावर विनोबांची स्वीकृती लागते. ज्या जमिनीचे दानपत्र केले असेल तिच्या संबंधी पुढील माहिती मिळवून सोबत जोडावी.

१) गाव, तालुका, जिल्हा

२) जमिनीचे नाव (असले तर), सर्व्हे नंबर,[१६] क्षेत्र, सरकारी सारा.[१७]

३) कोरडवाहू[१८] की बागाईत[१९]

४) जमीन दान केली तेवढी सर्व दात्याच्या मालकीची आहे काय? की त्यात हिस्सेदार[२०] आहेत? हिस्सेदारांची दानाला संमती असल्याबद्दल दानपत्रावर त्यांच्या सह्या घ्याव्या.

५) दात्याने आपल्या एकूण जमिनीचा कितवा हिस्सा दान दिला?

६) आज ती जमीन लागवडीखाली आहे काय? असल्यास कुळासंबंधी खालील माहिती द्यावी.

अ) हे कूळ कायद्याने संरक्षित आहे काय?

ब) किती वर्षांची कबुलायत[२१] आहे.

क) कुळाची याव्यतिरिक्त स्वतःची दुसरी जमीन आहे काय, असल्यास किती?

ड) जमीन दान करताना कुळाला दखलगिरी[२२] दिली आहे काय?

इ) जमिनीवर कसलाही बोजा[२३] आहे काय?

या माहितीबरोबर तलाठ्याकडून[२४] घेतलेला ७/१२ पत्रकाचा उताराही जोडला जावा.

केवळ सूचनापत्रक पाठवून फारसे काही साध्य होणार नाही याची विनोबांना कल्पना होती. म्हणून विनोबांनी भूदान मिळवित असताना भू-दात्याचा मान राखला जावा आणि चळवळीचाही हेतू साध्य व्हावा. यासाठी कार्यकर्त्यांना दहा कलमी कार्यक्रम[२५] दिला होता.

भूदान-यज्ञ हा एक क्रांतीचा कार्यक्रम आहे असा दावा आपण नेहमीच करीत असतो. तमाम शेतकऱ्यांपर्यंत गेल्याशिवाय आणि प्रत्येकाकडून सक्रिय मदत मिळविल्याशिवाय क्रांतीची भाषा उगीचच बोलणे निरर्थक आहे. त्याने फक्त आमचे हसे मात्र होईल म्हणून कार्यकर्त्यांनी तन-मन-प्राणे करून या कामी लागले पाहिजे.

१) प्रत्येक गावच्या सर्व भूमिहीन शेतकऱ्यांना पुरेल इतकी जमीन मिळवावी.

२) प्रत्येक गावच्या लहान-मोठ्या प्रत्येक शेतकऱ्याचा भाग यज्ञात मिळवावा.

३) जर काही गावात सर्वच्या सर्व जमीन मिळू शकत असेल तर तसा प्रयत्न केला जावा. त्यायोगे जमिनीची फेरवाटणी[२६] होऊन गावराज्याची स्थापना करता येईल.
(यातूनच पुढे ग्रामदान कल्पना उदयास आली.)

४) अक्षय-संपत्ती-दानसुद्धा[२७] मिळवावे. त्यातून गरीब भूमिहीनांना जमिनी व्यतिरिक्त इतर

आवश्यक ती मदतही देता येईल.

५) ग्रामोद्योग, ग्रामसफाई आणि व्यसनमुक्ती हे विचार समजावून दिले जावेत.

६) सामाजिक कामाकरिता सर्व शक्ती जागृत केली जावी.

७) शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामार्फत व्यापक जनसंपर्क साधावा.

८) पक्षभेद, जातिभेद, धर्मभेद इ. सर्व भेदांपासून निर्लिप्त राहून काम करण्याची वृत्ती निर्माण करावी.

९) याकरिता आवश्यक ते साहित्य गावोगावी पसरवावे.

१०) जेथे जेथे शक्य तेथे गावच्या सेवेकरिता सर्व सेवा संघ स्थापन करावेत.

असा दहा कलमी कार्यक्रम देऊन मग जमीन ताब्यात आल्यावर तिचे वाटप करणे ही अत्यंत जिकीरीची गोष्ट मानली जाई. जमीन वाटपाच्या संदर्भात सुद्धा विनोबांनी स्पष्ट सूचना केलेल्या होत्या त्या पुढीलप्रमाणे -

**जमीन वाटणी संबंधी आवश्यक सूचना[२८] -**

१) ''ज्या गावात जमीन वाटावयाची असेल, त्या गावी एक तारीख निश्चित करून तिची सूचना एक आठवडा अगोदर गावच्या लोकांना दवंडीने किंवा जाहिरात वाटून दिली पाहिजे. घरोघर ही गोष्ट कळावी अशी व्यवस्था करावी.

२) शिवाय वाटणी करण्याच्या एक दिवस अगोदर सुद्धा पुन्हा त्या गावी सूचना द्यावी. वाटपाच्या कार्यक्रमाची सूचना जिल्हा कलेक्टरला व संबंधित अधिकाऱ्यांनाही दिली जावी, त्यायोगे त्यांना वाटपाच्या वेळी हजर रहाता येईल.

३) वाटप करणाऱ्यांनी जमिनीविषयीची सगळी माहिती गाव पंचायतीने अध्यक्ष व पाटील यांच्यामार्फत अगोदरच मिळवून ठेवावी. त्या जमिनीची स्थिती, प्रकार[२९] आणि योग्यता प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन पाहून घ्यावी.

४) बिनजमीनवाले कोण आहेत, त्याची माहिती सगळ्या गावची सार्वजनिक सभा बोलावून करून घ्यावी.

५) जमीन वाटप सुद्धा गावकऱ्यांची सार्वजनिक सभा घेऊन तिच्यात व्हावे. सभेला मामलेदारानेही[३०] हजर रहावे. मामलेदारांच्या जागी जिल्हाधिकारी दुसऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करू शकतात. खेरीज गावचा पाटील[३१] व तलाठी यांनीही हजर असणे आवश्यक आहे.

६) शक्य तितके करून जमिनीचे वाटप हे सर्वानुमते व्हावे. मतभेद दिसू लागला तर, कोणा बिनजमीनवाल्यांना जमीन द्यावी याविषयी निर्णय बिनजमीनवाल्यांकडून घ्यावा, भूदान-यज्ञ समितीच्या प्रतिनिधीला अंतिम निर्णय द्यावाच लागला, तर तो चिठ्ठ्या टाकून करावा.

७) वाटपाच्या कामी गावच्या सज्जनाचे व पंचांचे सहकार्य घेतले जावे, की ज्यामुळे पुढे नवी जमीन मिळविण्याच्या किंवा बिनजमीनवाल्यांना इतर सोयी करून देण्याच्या कामी त्यांचे पूर्ण सहकार्य लाभावे.

८) शक्य तितके करून मिळालेल्या जमिनीचा तिसरा हिस्सा हरिजनांना वाटला जावा.

९) जमीन शक्यतो त्याच गावच्या बिनजमीनवाल्यांना द्यावयाची आहे, पण जर दानात मोठमोठ्या जमिनी मिळाल्या असतील तर गावाची गरज संपवून त्या जमिनीवर बाहेरच्या लोकांना आणवून वसविता येईल.

१०) नव्या लोकांना आणवून किंवा मोठमोठ्या वस्त्या वसवावयाच्या असतील, तर प्रादेशिक कमिटीने त्यासाठी विशेष नियम बनवावे.

११) जमीन अशाच बिनजमीनवाल्यांना द्यावी की, ज्यांना कोणताही उपजिविकेचा धंदा नाही, जे शेती करू इच्छित असतील आणि जमीन स्वतः कसू शकतील.

१२) पाच माणसांच्या कुटुंबाला सामान्यतः एक एकर बागाईत किंवा अडीच ते पाच एकर कोरडवाहू जमीन दिली जावी. तथापि, जमिनीचा प्रकार पाहून विशिष्ट परिस्थितीत पाचाहून अधिक एकरही देता येईल.

१३) दानात मिळालेल्या जमिनीच्या लहान लहान तुकड्यांची अदलाबदल करून यथाशक्य एक मोठा तुकडा करण्याचा प्रयत्न करावा. फारच लहान तुकडे जेथे बिनजमीनवाल्यांना देणेच शक्य नसेल, किंवा जेथे बिनजमीनवाला कोणीच नाही. तेथे ज्याची जमीन अतिशय कमी आहे त्याला ते तुकडे देता येतील. तसेही शक्य नसेल, तर त्या तुकड्यांचा उपयोग कंपोस्ट खताचे खड्डे, संडास अशा प्रकारच्या ग्रामोद्योगी कामासाठी करता येईल.

१४) ज्यांना जमीन दिली त्यांना ती दहा वर्षेपर्यंत विकता येणार नाही.

१५) जमीन हातात पडताच जर तिच्यात शेती सुरू करण्याजोगी ती असेल, तर जमीन घेणाऱ्याने त्याच वेळेपासून नियमानुसार जो सरकारी सारा असेल तो दिला पाहिजे.

१६) दानात मिळालेल्या जमिनीची लागवड होऊ शकली नाही, किंवा लागवड न करताच राहिली, तर ती जमीन दुसऱ्या बिनजमीनवाल्या शेतकऱ्याला देण्याचा अधिकार सरकारला असेल.

१७) जेथील जमीन वाटली जाईल. तेथील उरलेल्या बिनजमीनवाल्यांकरिता आणखी नवी जमीन मिळविण्याचा प्रयत्न केला जावा.

१८) प्रांतीय समिती परिस्थिती पाहून कार्य चांगल्या रीतीने चालावे म्हणून वेळोवेळी निर्णय घेईल.

यानंतर सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वाटपाचा. भूदान यज्ञात मिळालेल्या जमिनीचे वाटप

कसे केले जाते असा एक प्रश्न नेहमी केला जाई. त्याप्रमाणे भूवितरणाच्या बाबतीत इतरही अनेक शंका उपस्थित केल्या जात. प्रत्यक्ष भूवितरण केलेल्या एका कार्यकर्त्याचा अनुभव पुढीलप्रमाणे[३२]

१) ज्या गावात जमीन वाटावयाची त्या गावी जमीन वाटपाच्या कार्यक्रमाची तारीख अगोदर निश्चित केली जात असे. आणि त्याची वर्दी त्या व आसपासच्या गावातील लोकांना दवंडी पिटून सात दिवस आधी दिली जात असे. भेटूनही त्याबद्दल सांगितले जाई. शिवाय प्रत्यक्ष त्या तारखेच्या आधी एक दिवस पुन्हा एकवार सर्व लोकांना पूर्वसूचना दिली जाई.

२) या सात दिवसात वाटपाचे काम करणारे कार्यकर्ते दान मिळालेल्या जमिनीची व तिच्या मगदुराची पाहणी करत. आणि एका शेतकरी कुटुंबाला निर्वाहासाठी किमान किती जमीन देणे जरूर आहे, त्याचे प्रमाण निश्चित करत. जमिनीची पाहणी करीत असता ग्रामपंचायतीचा प्रमुख व सरकारी पटवारी बरोबर घेण्याचाही प्रयत्न केला जाई.

३) जिल्हाधिकारी व इतर संबंधित खात्याच्या अधिकारीवर्गाला वाटपाची तारीख व ठिकाण कळवले जाई. अपेक्षा अशी की स्वतः जिल्हाधिकारी किंवा त्याचा कोणी तरी प्रतिनिधी व पटवारी त्या प्रसंगी हजर रहावा.

४) वाटपाच्या दिवशी ज्या गावात तो कार्यक्रम होतो त्या गावातील सारे लोक एकत्र जमत. दान देणारेही हजर राहत. त्या सर्वांना भूदानामागील विचार आणि वाटपाची पद्धती व धोरण स्पष्ट शब्दात समजावून सांगितले जाई. त्यानंतर जमलेल्या लोकांपैकी जे भूहीन असतील त्यांना उठून उभे राहण्याची सूचना केली जाई. काही भूहीन उभे रहात तर काही संकोचाने आपण भूहीन असल्याचे सांगत नसत. म्हणून पुन्हा एकदा सांगण्यात येत असे व मग सारे भूहीन उभे रहात. सर्वजण गावातीलच असल्याने ते खरोखरीच भूहीन आहेत की नाही हे इतर गावकरी ओळखू शकत. शिवाय महसूल खात्याचा पटवारी (तलाठी) येथे हजर असे त्यामुळे खरा गरजू भूहीन कोण आहे हे समजण्यास अडचण पडत नसे.

५) भूहीनांचे तीन वर्ग संभवतात –

अ) शेती करू शकणारे, शेतीशिवाय उदरनिर्वाहाचे दुसरे साधन नसलेले आणि सध्या दुसऱ्याच्या जमिनीवर राबणारे शेतमजूर[३३]

ब) उदरनिर्वाहाचे अन्य साधन असले तरी ते अत्यंत मामुली असल्याने त्यांच्या कुटुंबाचे पोषण त्यावर होत नाही असे शेती जाणणारे व करू शकणारे अन्य व्यावसायिक खेडूत.

क) केवळ जमिनीवरच गुजराण करणारे परंतु जमीन फारच थोडी असलेले गरीब शेतकरी.

६) आमच्याजवळ वाटपासाठी असलेल्या जमिनीतून प्रथम पहिल्या वर्गातील भूहीनांना जमीन दिली जाई आणि उरलेली तिसऱ्या वर्गातील लोकांना दिली जाई.

७) परंतु एखाद्या गावात पहिल्या वर्गातील भूहीन अधिक आहेत आणि वाटावयाची जमीनच कमी अशीही परिस्थिती निर्माण होई. अशा वेळी जमीन कशी वाटावयाची असा प्रश्न उभा राही. अशा परिस्थितीत त्यासंबंधीचा निर्णय घेण्याची जबाबदारी भूहीनांवरच टाकली जाई. त्यांच्यापैकी प्रथम कोणाला जमीन दिली जावी. हे त्यांचे त्यांनी ठरवावे असे त्यांना सांगण्यात येई. त्यांना ते जमले नाही तर चिठ्ठ्या टाकून ज्याचे नाव येईल, त्याला जमीन दिली जाई. वाटप करणारा भूदान चळवळीतील कार्यकर्ता अशा परिस्थितीत स्वतः अखेरचा निर्णय घेत नसे. तो केवळ साक्षीदार म्हणून काम करीत असे. चिठ्ठ्या टाकून कोणाला जमीन द्यावयाची याचा निर्णय झाल्यावर, त्या भूहीनाकडून जमीन मागणीच्या एका छापील अर्जावर सही घेतली जाई आणि त्यांना जमीन देताना ती दिल्याचे एक प्रमाणपत्र दिले जाई. या प्रमाणे पत्रावर भूदान समितीचे प्रतिनिधी, जिल्हाधिकाऱ्यांचा प्रतिनिधी (पटवारी) आणि ग्रामपंचायतीचा अध्यक्ष यांच्या सह्या असत. भूहीनाला असे प्रमाणपत्र व्यवस्थित स्वरूपात मिळेल अशी काळजी घेणे हे भूवितरणाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे कर्तव्य समजले जाई.

८) हा सर्व व्यवहार कोणत्याही प्रकारची फी न घेता केला जाई. भूहीनाला कोणताच खर्च कधीही करावा लागत नसे.

९) मिळालेली जमीन भूहीनाने किमान दहा वर्षे तरी स्वतःच कसली पाहिजे आणि दान घेतल्या दिवसापासून तीन वर्षांचे आत ती लागवडीखाली आणली पाहिजे, नाही तर ती दुसऱ्या योग्य अशा भूहीनाला दिली जाईल.

१०) कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिमागे १ बिघा याप्रमाणे जमीन देण्याचा प्रयत्न आहे.

यातूनच कार्यकर्त्यांचा हुरूप आणि आत्मविश्वास वाढू लागला.

अशा रितीने महाराष्ट्रात कार्यकर्त्यांना प्रवृत्त करण्यात आले. कार्यकर्त्यांना जमीन दानात मिळू लागली. ही दाने मिळविण्याचे काम स्त्रियांनीही केले. कित्येक ठिकाणी शालेय विद्यार्थी आणि युवक-युवतींनी शिक्षकांच्या मदतीने शहरातून आणि खेड्यांपाड्यातून विचार प्रचाराचे आणि त्याचा परिणाम म्हणून भूमिप्राप्तीचे काम मोठ्या हौसेने केले.

राष्ट्रसेवादलाच्या भूदान पथकाने जवळ-जवळ १ वर्षभर महाराष्ट्रात पदयात्रा चालविली आणि अनेक दाने मिळविली. कस्तुरबा निधीच्या कार्यकर्त्या मुली काही भागात हिंडल्या, त्यांनीही विचार परिवर्तनाचे हे कार्य केले आणि विचार परिवर्तनाला थोरामोठ्यांची गरज आहे असे नाही हे त्यांच्या कामातून सिद्ध होऊ शकले. हरिजन-सेवक-संघाच्या सेवकांनीही दाने मिळविली. राजकीय पक्षातल्या काँग्रेसच्या आणि प्रजासमाजवादी पक्षाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी कित्येक वेळा दौरे काढले, पदयात्रा केल्या आणि हा विचार पटवून देण्याचा आणि दाने मिळविण्याचा प्रयत्न केला. जमीन मागताना जमिनी

ज्यांना दिल्या जातील त्यांना साधने सुद्धा द्यावी लागतील हे जाणून कित्येक महिला संघटनांनी व इतरांनी साधनदानेही मिळविली.[३४]

येथे आपणास महाराष्ट्रातील विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील बारा जिल्हे व विदर्भातील भूदान अभ्यासायचे आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, कुलाबा, ठाणे, नाशिक, धुळे,जळगाव या जिल्ह्यांमधील भूदान प्राप्ती व वाटपाचा विचार येथे केलेला आहे.[३५]

विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या आठ जिल्ह्यांधील भूदान प्राप्ती व वितरणाचा अभ्यास येथे केलेला आहे.[३६]

पश्चिम महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यांतील भूदानासाठी स्वतंत्र दानपत्र भूदान समितीने तयार केले होते. ते पुढीलप्रमाणे -

**भूदान-यज्ञ-दानपत्र**

आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान-यज्ञाच्या आवाहनानुसार

मी/आम्ही-----------------------------------------

-----------------------------------------

पत्ता------------मालकीची एकूण जमीन (अक्षरी)---------

-------आहे. त्या जमिनीपैकी-----एकर-----गुंठे-----गाव

------तालुका-----जिल्हा येथील ठिकाणाचे सर्व्हे नंबर/पोटहिस्सा[३७]

क्षेत्र/प्रकार कोरडवाहू, बागाईत, जिराईत (भातपिकी), वरकस, खडकाळ

इ. असेल ते वर्णन लिहावे./सारा/गावठी नांव[३८]/चालू कब्जेदार[३९]

विशेष माहिती - जमिनीच्या चालू कब्जेदाराच्या हक्काचे स्वरूप, अन्य काही

अडचणी इ. संबंधी येथे लिहावे.

ही जमीन/ह्या जमिनी/ श्री. विनोबांनी सुरू केलेल्या भूदान यज्ञाप्रित्यर्थ विचारपूर्वक आपल्या राजीखुषीने देत आहे/आहो. या दान दिलेल्या जमिनीवर यापुढे माझा/आमचा किंवा माझ्या/आमच्या घराण्यातील किंवा वारसातील कोणाचाही हक्क राहणार नाही. ही जमीन/ह्या जमिनी श्री. विनोबांनी गरिबांच्या हिताकरिता स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे उपयोगात आणावी/आणाव्या.

मुक्काम-----------तारीख-----------दात्याची सही वा सह्या

साक्षीदारांची नावे व सह्या ----------------

१) ------------ सही ------------

---------------

२) ------------- सही ------------

स्वीकृती

----------------

या दानपत्राच्या[४०] दोन प्रती करून घेण्यात येत असत. एक प्रत भूदान समितीच्या कचेरीत तर दुसरी त्या जिल्ह्याच्या सरकारी महसूल अधिकाऱ्याकडे पाठवीत असत. भूदानाच्या मोहिमेत १९५९ अखेरपर्यंत महाराष्ट्रात ८००१ दानपत्रे मिळाली. इतक्या साऱ्या जमिनीची शहानिशा करणे हे पहिले काम होते. या दानपत्रातून जी जमीन भूदान-समितीकडे आली तिचे जिल्हावार आकडे पुढील प्रमाणे[४१]–

| जिल्हाचे नाव | भूदाने | भूदान क्षेत्र एकर गुंठे |
|---|---|---|
| पुणे | ३१० | ५८४-१० |
| अहमदनगर | १८१ | ८१७-३५ |
| सोलापूर | ३५२ | १२१९-१० |
| सातारा | ८५८ | ३१६४-११ |
| सांगली | १३२ | ११७१-३१ |
| कोल्हापूर | ४५५ | १२६४-३७ |
| रत्नागिरी | ९२१ | ५५९९-०७ |
| कुलाबा | ५३२ | ३७३८-१२ |
| ठाणे | ५०७ | ६८८७-१३ |
| नाशिक | ७०२ | ३५८०-२४ |
| धुळे | १९४३ | ८७२९-३६ |
| जळगाव | ११०९ | ४४०५-०८ |
| | ८००२ | ४११५९.३४ |

(आधार – गांधी बाबूलाल, 'भारतातील भूमिहीन आणि भूदान', पृ.१०९-११०)

१९५९ अखेरपर्यंत महाराष्ट्रात १२ जिल्ह्यातील, १४१ तालुक्यातून २८२५ गावात, ८००२ दात्यांकडून ४११५९.३४ एकर जमीन भूदान यज्ञामध्ये मिळाली.

विदर्भात प्राप्त झालेल्या भूदानाची परिस्थिती पुढीलप्रमाणे होती. १९६९ पर्यंत भूदान झालेल्या खेड्यांची संख्या, दात्यांची संख्या आणि प्राथमिक दान झालेले क्षेत्र.[४२]

| जिल्हा | भूदानाची खेड्यांची संख्या | दात्यांची संख्या | दान झालेले क्षेत्र (एकर) |
|---|---|---|---|
| अकोला | ४२६ | ११७७ | ७०८९.२६ |
| अमरावती | ५४९ | १४६१ | ५१८९.७९ |
| भंडारा | ६०२ | २०६७ | ४७९२.०७ |
| बुलढाणा | १९८ | ४२१ | २७३२.५४ |
| चंद्रपूर | ५७७ | १७९५ | ४९८४.१५ |
| नागपूर | ६७२ | १६७९ | ७३९६.२८ |
| वर्धा | ७५१ | ३७७० | १२५४७.४० |
| यवतमाळ | १०९८ | ५२१९ | ४९७४१.२२ |
| विदर्भ | ४८७१ | १७५८९ | ९४४७२.७१ |

(आधार – नानेकर कृ. र., खांदेवाले श्री. वि., 'विदर्भातील भूदान', पृ. ४२.)

वरील दोन्ही सारणींवरून महाराष्ट्रातील २० जिल्ह्यांचे प्रातिनिधिक चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. एकवेळ भूदान मिळविणे सोपे परंतु वाटप अवघड, अशी परिस्थिती भूदान चळवळीला व्यापक प्रतिसाद मिळू लागल्यावर झाली. वाटप कामासाठी आणि अधिकृत हस्तांतरणासाठी सरकारी मदत अपरिहार्य ठरली.

## सरकारी आज्ञापत्र (G. R.)[४३]

सरकारने कायदेशीर तरतूद केल्याशिवाय भूदान वाटप अधिकृत होणार नव्हते. सरकारी कागदपत्रात, महसूल अभिलेखात (रेकॉर्ड) नव्या मालकांची नोंद झाल्याशिवाय 'नवे भूदाते' जमीन कसू शकत नव्हते. म्हणून महाराष्ट्रात तत्कालीन मुंबई सरकारने पुढील 'आज्ञापत्र' (G. R.) काढले.

Bhoodan Movement,

Removal of certain difficulties

In the way of ........

GOVERNMENT OF BOMBAY,

Revenue Department

Circular Memorandum No. BEY. 1055

Sachivalaya, 22 nd July 1955.

CIRULAR MEMORANDUM OF GOVERNMENT.

Government is pleased to issue the following instructions in connection with Bhoodan Yagna Movement sponsored by Acharya Vinoba Bhave.

a) The Bhoodan Samiti recognized by Acharya Vinoba or the Sarva Seva Sangh will send to the Mamlatdar / Mahalkari ** a list of lands gifted to it along with the original "Danapatra" (gift deed) and the statement of persons to whom a particular land has been granted by the Samiti with full description thereof;

b) On receipt of the documents referred to at (a) above, the Mamlatdar / Mahalkari should himself or through his subordinate Revenue officers ascertain the validity or otherwise of the "Danapatra" and should cause necessary entries to be made in the Record of Rights as under :-

On receipt of intimation of the 'Danapatra' from the Bhoodan Samiti, the village officers should make an entry in village form VI entering the name of the person to whom the land has been donated by the Samiti. The Record Right enquiry should then be held in normal course The Mamlatdar / Mahalkari should, however, certify the entry himself after local enquiry. When the entry is certified final change in village form VI** and under 'other rights' column in village Form VII,** the fact that Bhoodan Samiti is interested should be noted.

c) In case the Mamlatadar/Mahalkari finds that the "Danapatra" or the statement is incomplete requiring some more details, he should return it to the Bhoodan Samiti along with the memorandum containing points or details or lacuna which are required to be elaborated or filled in and on receipt of full information from the samiti, the Mamlatadar/Mahalkari should proceed further as indicated under (b) above.

2) It may be noted that the Revenue officers are not concerned with the validity or otherwise of the transactions as a result of Bhoodan Movement. They are concerned only with the position that in virtue or certain transfers, possession has changed hands and they have to give effect to it in the village records.

3) The necessary notification exempting from stamp duty retrospectively and perspectively the instruments evidencing transfers of lands in favour of or by the Bhoodan Samiti or the Sarva Seva Sangh is being published in part – IV – A- of the Bombay Government Gazette.

4) Government is also pleased to direct that the fees for measuring land at the instance of the Bhoodan Samiti should be recovered form the person to whom the land is given by the Samiti.

By order and in the name of the Governer of Bombay.

P. N. Ambegaonkar,

Assistant Secretary to Government.

**अनुवाद :-**

खालील आज्ञा मुंबई सरकारच्या महसूल खात्याने आपल्या अधिकाऱ्यांना सर्क्युलर मेमो नं. BEY १०५५ ने ता. २२ जुलै १९५५ रोजी दिली आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी पुरस्कारलेल्या भूदान-यज्ञ आंदोलनाच्या बाबतीत सरकार खालील प्रमाणे आज्ञा देत आहे.

१) (अ) आचार्य विनोबा भावे यांनी अथवा सर्व-सेवा-संघाने मान्य केलेली भूदान समिती दानात मिळालेल्या जमिनीची यादी मूळच्या दानपत्रांसह व त्या जमिनी ज्या कोणाला दिलेल्या असतील त्यासंबंधीच्या संपूर्ण माहितीसह मामलेदाराकडे/महालकऱ्याकडे पाठवील.

ब) 'अ' मध्ये नमूद केलेले कागदपत्र मिळाल्यानंतर मामलेदाराने /महालकऱ्याने स्वतः अथवा आपल्या कनिष्ठ महसूल-अधिकाऱ्यामार्फत दानपत्र खरेखुरे आहे की नाही (Validity or other wise)या संबंधीची खात्री करून घ्यावी आणि हक्कनोंदणी[४७] (Record of Rights) पत्रकात अवश्य त्या नोंदी खालीलप्रमाणे करावयास लावाव्या -:

भूदान समितीकडून दानपत्राची सूचना मिळताच गांव-कामगारांनी गांवगाडा पत्रक नं. ६ मध्ये (किंवा पत्रक ड मध्ये) समितीने ज्या इसमास जमीन दिली असेल त्याचे नाव नोंद करावे. मग हक्कनोंदणीची चौकशी नेहमीच्या पद्धतीने करावी. मात्र मामलेदाराने/महालकऱ्याने अशा स्थानिक चौकशीनंतर ही नोंद खरी म्हणून स्वतः मंजूर करावी. ही मंजुरी दिल्यांनतर गांवगाडा पत्रक नं. ७ मध्ये शेवटचा फेरफार करावा. गांवगाडा पत्रक नं. ६ मध्ये व पत्रक नं. ७ मधील 'इतर हक्क' या सदराखाली भूदान-समितीशी या जमिनीचा संबंध असल्याचे नोंद करून ठेवावे.

क) मामलेदारास/महालकऱ्यास दानपत्र किंवा माहितीपत्रक अपुरे आहे व अधिक तपशिलाची गरज आहे असे वाटले तर ते त्यांनी परत भूदान-समितीकडे पाठवावे व सोबत कोणत्या तपशीलाची कमतरता आहे हे जाणवून देणारे पत्र लिहावे. अशी पूर्ण माहिती समितीकडून आली म्हणजे मामलेदार/महालकरी याने वर (ब) मध्ये सांगितल्याप्रमाणे पुढच्या कामाला लागावे.

२) भूदान आंदोलनामुळे घडून आलेल्या व्यवहाराच्या खरेखोटेपणाशी (Validity or other wise) महसूल अधिकाऱ्यांचा काहीही संबंध नाही. हक्काच्या काही बदलामुळे जमिनीचा ताबा एकाच्या हातून दुसऱ्याकडे गेला आहे आणि आपल्याला गावाच्या दप्तरांत त्याची नोंद करून ठेवावयची आहे एवढ्यापुरताच त्यांचा संबंध आहे.

३) भूदान समितीकडून किंवा सर्व सेवा-संघाकडून अथवा त्यांच्यापैकी कोणाही करिता मागे झालेल्या किंवा पुढे होणाऱ्या जमिनीच्या अदलाबदलीच्या कागदपत्रांना स्टँप-ड्युटीतून मुक्त करण्यात आल्याचे मुंबई सरकारच्या भाग ४-अ या गॅझेटात प्रसिद्ध करण्यात येते आहे.

४) वाटलेल्या जमिनीची भूदान-समितीच्या सूचनेवरून जर मोजणी झाली, तर मोजणीची फी ज्या इसमाला जमीन दिली आहे त्याच्याकडून वसूल करावी.

पी. ए. आंबेगावकर,

(असि. सेक्रेटरी टु गव्हर्नमेंट)

## टिपणी

वर दिलेल्या कायद्यातील काही शंकांच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदेश भूदान यज्ञ समितीचे कार्यवाह श्री. भाऊ धर्माधिकारी हे त्यावेळेचे महसूल मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांना भेटले होते. त्यांच्याकडून जो लेखी खुलासा झाला तो पुढीलप्रमाणे :-

१) हुकुमातील पहिल्या परिच्छेदात येणारा 'दानपत्राचा खरेखोटेपणा' (Validity or other wise) हा शब्दप्रयोग दानपत्र करण्याचा कायदेशीर हक्क व त्या बाबतीत कायद्याने करावयाच्या रीतसर गोष्टी यास अनुलक्षून वापरण्यात आला आहे. महसूल अधिकाऱ्यांचा संबंध या कायदेशीर व्यवहाराशी नसून तो फक्त या बाबतीतील अधिकृत ताब्यापुरता आहे.

२) ज्या कोणास जमीन दान करण्यात आली असेल त्याने दानपत्रातील शर्तीचा भंग केल्यास ती जमीन दंडादाखल जप्त होण्यास पात्र ठरेल. सरकार ती जमीन जप्त करून भूदान-समितीकडे मूळ अटी अनुसार विल्हेवाट लावण्यासाठी परत करील.

३) या कामी राज्य सरकारने मान्यता दिलेल्या एखाद्या भूदान समितीच्या नावे किंवा अशा समितीने इतर कुणाच्या नावे ज्या जमिनी करून दिल्या असतील अशा जमिनींना कूळ कायद्याचा अंमल लागू होणार नाही. तथापि कुळांना आपल्या कूळवहिवाटीचे हक्क दान करून देता येतील अशी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

४) हक्क नोंदणीच्या (Record fo Righths) कामाच्या बाबतीत सरकार नोंदणीची[४८] (रजिस्ट्रेशनची) सक्ती करणार नाही. रीतसर नोंदणी करून दिवाणी कायद्याखाली आपले हक्क अबाधित राखणे हे अशा बाबतीत संबंधित पक्षाच्या हिताचे असते. मालमत्ता तबदील करण्याबाबत अधिनियम व भारताच्या नोंदणी (रजिस्ट्रेशन) बाबत अधिनियम या अन्वये अशा सर्व दानपत्रांची नोंदणी फी ही केलेल्या कामाबद्दलची फी असल्यामुळे ती माफ करता येत नाही याबद्दल सरकारला दिलगिरी वाटते.

सरकारने केलेली दुसरी एक मदत म्हणजे १९५७ च्या सुधारलेल्या कूळकायद्यात ८८ (अ) या

कलमान्वये भूदानात मिळालेली जमीन कूळकायद्याच्या अमलातून मुक्त ठेवली ही होय. कलम ८८ अ-राज्य सरकारने या बाबत मान्यता दिलेल्या भूदान समितीकडे हस्तांतरित केलेल्या किंवा तिने हस्तांतरित केलेल्या जमिनीस कायद्यातील उपबंधापैकी कोणताही उपबंध लागू असणार नाही.

या राज्यात 'तुकडे बंदी' कायदा[४९] झाला आहे. त्या अनुसार जमिनीचा तुकडा विशिष्ट मर्यादेपेक्षा कमी पाडणे गुन्हा मानला आहे. आणि जेथे असा तुकडा पाडण्यात आलेला आढळेल तेथे २०० रुपये दंडाची शिक्षा ठेवण्यात आली आहे. या कायद्यानंतरही भूदान-समितीकडे लहान लहान तुकड्यांची दानपत्रे आली. 'तुकडे बंदी' कायद्याबरोबरच 'तुकडेजोडीसंबंधी कायदा'[५०] त्याप्रमाणे जिल्ह्या जिल्ह्यातून तुकडे जोडण्याचे काम यावेळी सरकारने चालू केले होते. हे काम करताना जेथे जेथे मिळालेले तुकडे असतील तेथे त्या तुकड्यांना प्राधान्य द्यावे आणि ज्यांनी दान केले आहे त्यांना दंड माफ करावा अशा प्रकारची तिसरी सवलत सरकारने भूदान तुकड्यातील जमिनीच्या बाबतीत दिली आहे.

सरकारी पातळीवरून (G. R.) निघाला तरी सरकारकडून सर्वच मदत झाली असे नाही. सरकारची भूमिका स्वेच्छेने मदत करण्याऐवजी आमच्याकडे मदत मागायला आलात तर मागाल तेवढीच मदत करू किंवा आम्हाला शक्य असेल तेवढीच मदत करू. अशीच भूमिका कायम होती.

## पश्चिम महाराष्ट्रातील वाटप -:

जसजशी जमीन मिळत गेली तसतसे वाटपाचे प्रश्न उभे राहिले. वाटप करताना फारसा विचार न करता किंवा चौकशी न करता जमीन वाटून टाकावी तर ते वाटप न्यायाचे करणे अवघड होते. भूदानाचा विचार लक्षात घेऊन ज्या जमिनीचे दान करावे असा विचार दात्याच्या मनात आला तो हेतू म्हणजे गावातल्या योग्य भूमिहीनालाच ती जमीन मिळावी हा असायचा. गावातील विघातक प्रवृत्तीच्या लोकांच्या दडपणामुळे जमीन खऱ्या भूमिहीनालाच जाईल असे घडणे अवघड. यावर उपाय म्हणून विनोबाजींनीच एक निःपक्षपाती, प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीची जमीन-वाटपाची पद्धत घालून दिली होती. ती पद्धत पुढीलप्रमाणे :-

वाटप पद्धती [५१]

१) ज्या गावी जमीन वाटायची त्या गावाकरिता तारीख निश्चित करून त्या अगोदर ७ दिवस व खुद्द त्या दिवशी ठरलेल्या वेळी व ठरलेल्या ठिकाणी जमीन-वाटपाकरिता सभा भरणार असल्याची दवंडी गावात दिली जावी. हरिजनवाड्यांसह घरोघर ही गोष्ट कळविण्याची खबरदारी घ्यावी.

२) जमीन कोणाला वाटायची हा अधिकार कोणाही व्यक्तीला नाही. वाटप हे गावच्या आमसभेत पुढील दिलेल्या पद्धती अनुसारच व्हावयाचे असते -:

अ) सभेत प्रथम योग्य व्यक्तींनी भूदान यज्ञाचा हेतू, वाटपाची रीत ही समजावून द्यावी. शेवटी

सारी जमीन गावाची व्हावयाची हे उद्दिष्ट असल्याचे समजावून सांगावे;

आ) त्यानंतर गावात आतापर्यंत मिळालेली जमीन कोणती व किती भूमिहीन कुटुंबात वाटता येण्याजोगी आहे हे सर्वांना समजावून सांगावे.

इ) त्यानंतर गावच्या आमसभेत भूमिहीन शेतकऱ्यांची निवड करावी. भूमिहीन शेतकरी म्हणजे ज्याला जमीन कसता येते पण ज्याच्याजवळ स्वतःची किंवा कूळहक्काची जमीन मुळीच नाही आणि ज्याला अन्य उपजिविकेचे कसलेही साधन नाही असा पुरुष किंवा स्त्री.

ई) पण जर भूमिहीन कुटुंबे अधिक आणि मिळालेली जमीन कमी अशी स्थिती असेल तर भूमिहीनांनाच आपसात जास्त गरजू कोण हे ठरविण्यास सांगावे. या कामी कोणत्याही प्रकारचे दडपण येणार नाही याची खबरदारी घ्यावी. कोणत्याही कारणास्तव भूमिहीनांना आपसात निर्णय करता आला नाही तर चिठ्ठया टाकून निर्णय घ्यावा.

उ) शक्य तो ज्या दात्याने जमीन दिली आहे त्याच्या मार्फतच हा वाटपाचा कार्यक्रम पार पडेल असा प्रयत्न अगोदर व्हावा. दाता वाटप करू शकत नसेल तर कार्यकर्त्यांनी वाटपाचा कार्यक्रम घडवून आणावा.

ऊ) वितरण करताना मिळालेल्या जमिनीचा १/३ वाटा हरिजन कुटुंबांना द्यावा.

विनोबांनी घालून दिलेल्या वरील पद्धतीप्रमाणे वाटप करताना भूदान-यज्ञ समितीने त्या बाबतीत एक धोरण ठरविले होते; ते पुढील प्रमाणे -

१) दानात मिळालेली जमीन त्याच गावातील भूमिहीनाकरिता मानावी. सदर गावात भूमिहीन कोणी नसेल, पण अपुरी जमीनवाले असतील तर त्यांना ती मिळावी. दोन्ही नसतील तर लगतच्या गावातील भूमिहीनाला जमीन देता येईल.

२) वाटावयाची जमीन ज्या गावात आहे त्या गावातील भूमिहीन कुटुंबाची माणसागणिक संख्या नमूद करून घेतली जावी.

३) या यादीत भूमिहीन व उपजिविकेचे इतर साधन नसणारे बेकार अशांचा समावेश होईल हे नीट पहावे.

४) दात्यांनी दान केलेली जमीन जर कुळाकडे लावलेली असेल आणि ते कूळ स्वतः भूमिहीन असेल किंवा फारच अल्प जमीनवाले असेल तर ती जमीन त्याला भूमिहीन समजून त्यालाच अगोदर दिली जावी.

५) जमिनीवर कूळ असून त्या कुळाची स्वतःची पुरेशी जमीन असूनही भूदानातील जमीन सोडण्याची त्याची तयारी नसेल तर, कूळ कायद्यातील कूळहक्काची कलमे भूदानातील जमिनीला लागू होत नाहीत हे कुळाला समजावून सांगून ती जमीन भूमिहीनाकडे कशी जाऊ शकते हे त्याला सांगावे

आणि तसा प्रयत्न करावा. मात्र त्या जमिनीच्या कब्जामुळे भूमिहीन व कूळ यांच्यात कटुता व संघर्ष वाढू नये एवढी खबरदारी घ्यावी.

ज्याला जमीन वाटण्यात आली त्याला विनोबाजींच्या तर्फे भूदान समितीकडून एक 'जमीन वाटणी प्रमाणपत्र'[५२] दिले जाते. हेतू असा की ती जमीन त्याची झाली याचा कागदी पुरावा त्याच्याकडे असावा. नंतर या प्रमाणपत्राची एक नक्कल व दात्याचे मूळ दानपत्रक जर ते अगोदर महसूल अधिकाऱ्याकडे पाठविले नसेल तर, या दोनही गोष्टी महसूल अधिकाऱ्याकडे पाठवून दिली जातात. सरकारी दप्तरात भूमिहीनाचे त्या जमिनीच्या खात्याला नाव लागते आणि 'इतर हक्कां'च्या पत्रकांत[५३] भूदान-समितीचे नाव लागते. मात्र, ही जमीन त्याला काही शर्तीवर मिळते. त्या शर्ती त्या वाटप प्रमाणपत्रातच नमूद केलेल्या असतात. व त्या कबूल असल्याबद्दल नव्या खातेदाराची कबुली सहीच्या रूपाने घेतली जाते. 'जमीन वाटणी-प्रमाणपत्र' परिशिष्ट क्र. २ मध्ये दिले आहे.

दानामध्ये मिळालेल्या जमिनीपैकी शेतीच्या दृष्टीने निरुपयोगी असलेल्या जमिनीच्या दानपत्रांच्या बाबतीत विल्हेवाट लावण्याचे कामही भूदान समितीने वाटपाच्या कामाबरोबरच केले. पण त्या संबंधीचे निश्चित धोरण प्रथम ठरविण्यात आले नव्हते. ते नंतर अनुभवाने ठरवावे लागले. ते धोरण पुढीलप्रमाणे-

दानात मिळालेल्या जमिनीचे क्षेत्र ८-१० गुंठे किंवा त्याहून कमी असेल, म्हणजे ती जमीन कसून उदरनिर्वाह करणे शक्य नसेल तर दात्याकडून अधिक जमीन मिळवून तो तुकडा पुरेसा मोठा करावा. तसे न जमले तर तो तुकडा दात्याकडेच राहू द्यावा. त्याने त्याची लागवड करावी व त्यातून खर्च वजा जाता जे निव्वळ उत्पन्न राहील ते महाराष्ट्र सर्वोदय-मंडळाकडे पाठवावे.

# परिशिष्ट क्र. २

## जमीन वाटणी प्रमाणपत्र

श्री.----------------------------------यांना

आचार्य श्री. विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदान-यज्ञ-आंदोलनामध्ये दान मिळालेल्या जमिनीपैकी गाव-------------तालुका---------------जिल्हा येथील रि. स. नं.------ची खालील चतुःसीमा असलेली कोरडवाहू/बागायती/भातपिकी/वरकस जमीन एकर--------गुंठे --------तुम्हाला आज रोजी देण्यात येत आहे. या जमिनीचे आजपासून तुम्ही कबजेदार झाला आहा. आणि म्हणून जमीन कसण्याचा, पीक काढण्याचा व पिकाचा उपभोग घेण्याचा सर्व हक्क-अधिकार तुमच्याकडे झाला आहे. योग्य त्या कायद्याने खालील शर्तीवर यापुढे तुमचे नाव जमिनीचा खातेदार म्हणून लागेल व ती जमीन वंशपरंपरा तुमच्याकडे चालेल. यासंबंधीचे हे प्रमाणपत्र आचार्य विनोबा भावे यांच्यातर्फे महाराष्ट्र प्रदेश भूदान समितीकडून तुम्हाला देण्यात येत आहे. तुम्ही या जमिनीची उत्तम कसणूक करुन जमीन चांगली राखाल आणि आपले व आपल्या देशाचे उत्पन्न वाढवाल अशी आम्हाला उमेद आहे. ता.

कार्यवाह

महाराष्ट्र प्रदेश भूदान समिती

साक्षीदार नाव

सही

साक्षीदार नाव

सही

जमिनीची चतुःसीमा

### शर्ती

१) सारी जमीन गावाची या तत्त्वानुसार भूदान-यज्ञात मिळालेली सर्व जमीन गावाच्या मालकीची समजली जाते.

२) जमीन ज्याला दिली त्याला ती विकता येणार नाही; पडीक किंवा गहाण टाकता येणार नाही; तिच्यावर कर्ज काढता येणार नाही; किंवा कसलाही बोजा करता येणार नाही. किंवा दुसऱ्या कोणाला पोटकूळ म्हणून (Sub Lease) भाड्याने देता येणार नाही.

३) दान दिलेली जमीन दोन वर्षेपर्यंत पडित पडलेली आहे किंवा तिचा यथायोग्य वापर केला नाही असे म. प्र. भू. समितीच्या मताने ठरले तर ती काढून घेण्याचा अधिकार श्री. विनोबा भावे यांच्यातर्फे म. प्र. भू. समितीला राहील.



Jayakar Knowledge Resource Centre

४) जमीन दिल्या तारखेपासून तिचा सरकारी सारा व लोकल सेस[५४] भरण्याची जबाबदारी जमीन घेणारावर आहे.

५) या सर्व शर्ती जमीन घेणाराच्या वारसासही लागू आहेत.

वरील शर्ती मला मान्य आहेत.

जमीन दिली त्याचे नाव — साक्षीदाराचे नाव

अंगठा/सही — अंगठा/सही

वाटणी पत्रानुसार वाटप करण्याचे काम सुरू झाल्यावर पश्चिम महाराष्ट्रातील वाटपाचे स्वरूप पुढील प्रमाणे असल्याचे दिसते.

पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये पुढील प्रमाणे परिस्थिती होती.[५५]

## जिल्ह्यातील तालुके

| जिल्हा | एकूण तालुके | दान मिळालेले तालुके | वाटप झालेले तालुके |
|---|---|---|---|
| पुणे | १३ | १२ | ११ |
| अहमदनगर | १३ | १३ | १२ |
| सोलापूर | ११ | ११ | ११ |
| सातारा | ११ | ११ | ११ |
| सांगली | ८ | ८ | ७ |
| कोल्हापूर | १२ | ११ | १० |
| रत्नागिरी | १५ | १५ | १५ |
| कुलाबा | १४ | १३ | १३ |
| ठाणे | १३ | १२ | १२ |
| नाशिक | १३ | १३ | १३ |
| धुळे | १० | ९ | ९ |
| जळगाव | १३ | १३ | १३ |
| | १४६ | १४१ | १३७ |

(आधार - गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १२२.)

## जिल्ह्यातील गावे

| जिल्हा | एकूण गावे | भूदान झालेली गावे | भूदान वाटप झालेली गावे |
|---|---|---|---|
| पुणे | १५११ | १२३ | ५३ |
| अहमदनगर | १३१९ | ११५ | ५१ |
| सोलापूर | ९३४ | १४२ | ९० |
| सातारा | ११५२ | १९२ | ७९ |
| सांगली | ५०२ | ६६ | ४४ |
| कोल्हापूर | ९४८ | १४२ | ५५ |
| रत्नागिरी | १५१५ | ३९० | २२० |
| कुलाबा | १७७६ | २४८ | १५४ |
| ठाणे | १६६५ | ३०० | १९१ |
| नाशिक | १६५३ | २७० | १७५ |
| धुळे | १५०१ | ३९१ | २१३ |
| जळगाव | १४२४ | ४४४ | २१५ |
| | १५९०० | २८२३ | १५४० |

(आधार – गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १२२.)

या तक्त्यावरून असे दिसते की एकूण गावसंख्येपैकी १७.७ टक्के गावातून म्हणजे १/६ गावातून जमीन मिळाली आहे आणि वाटप ९.६ गावातून झाले. दान मिळालेल्या गावांशी वाटप झालेल्या गावांचे प्रमाण ५४ टक्के आहे.

याच्याच आणखी तपशीलात गेलो तर प्रत्येक जिल्ह्यातील भूदान प्राप्ती क्षेत्र आपणास पहावे लागेल.[५६]

| जिल्ह्याचे नाव | भूदान प्राप्तीचे क्षेत्र | वाटप झालेले क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| पुणे | ५८४-१० | ४२०-२४ | ७२.२ |
| अहमदनगर | ८१७-३५ | ४४४-३५ | ५५.० |
| सोलापूर | १२१९-१० | ८४०-३९ | ६९.० |
| सातारा | ३१६४-११ | १९८२-२० | ६२.० |
| सांगली | ११७१-३१ | ६०५-३१ | ५१.० |
| कोल्हापूर | १२६४-३७ | १०१४-०४।। | ७७.० |
| रत्नागिरी | ५५९९-०७ | ३६८५-३४ | ६४.० |
| कुलाबा | ३७३८-१२ | २९६३-०२ | ७९.० |
| ठाणे | ६८८७-१३ | ५३३८-१२ | ७७.४ |
| नाशिक | ३५८०-२४ | २०१०-१९ | ५६.० |
| धुळे | ८७२९-३६ | ४२५१-०५।। | ४८.७ |
| जळगाव | ४४०५-०८ | ३६५०-०८ | ६०.० |
| | ४११५९.३४ | २६२०७-३७ | ६०.० |

(आधार - गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १२३.)

भूदानी गावे आणि वाटप क्षेत्राचे आणखी तपशीलवार चित्र स्पष्ट होण्यासाठी पुढील आकडेवारी उपयुक्त ठरेल.[५७]

| जिल्ह्याचे नाव | दातेसंख्या | जमीन घेत्यांची संख्या | वाटलेली जमीन एकर गुंठे |
|---|---|---|---|
| पुणे | ११६ | १२८ | ४२०-२४ |
| अहमदनगर | ७३ | ८० | ४४४-३५ |
| सोलापूर | १५२ | १६९ | ८४०-३९ |
| सातारा | १०७ | ४५३ | १९८२-२० |
| सांगली | ८५ | १६४ | ६०५-३१ |
| कोल्हापूर | १२८ | १६८ | १०१४-०४॥ |
| रत्नागिरी | ५३१ | १००० | ३६८५-३५ |
| कुलाबा | २३२ | ९५० | २९६३-०२ |
| ठाणे | ३११ | १२०६ | ५३३८-१२ |
| नाशिक | ३५४ | ३९९ | २०१०-१९ |
| धुळे | ९७९ | ८४४ | ४२५१-०५॥ |
| जळगाव | ३१५ | ४४० | २६५०-०८ |
| | ३३८३ | ६००१ | २६२०७-३७ |

(आधार - गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १२४.)

वरील तक्त्यावरून आपणास पश्चिम महाराष्ट्रातील भूदानाचे चित्र पुरेसे स्पष्ट होते. महाराष्ट्रातील भूदानाचे आर्थिक दृष्ट्या मूल्यमापन करू गेल्यास पुढील निष्कर्ष हाती येतात.

**वाटप जमिनीचे स्वरूप** [५८]

महाराष्ट्रात मिळालेल्या जमिनीचे स्वरूप साधारणपणे मध्यम प्रतीचे पडते. वाटप झालेल्या जमिनीचा एकूण सारा २०६२९ रुपये आहे. त्याची सरासरी १९ आणे पडते.

१) १० टक्के जमीन- एक रुपया किंवा त्याहून अधिक साऱ्याची आहे.

२) ५० टक्के जमीन - ८ आणे ते १५ आणे दरम्यानच्या साऱ्याची आहे.

३) २५ टक्के जमीन - ६ आणे ते ८ आणे दरम्यानच्या साऱ्याची आहे.

४) १५ टक्के जमीन - ४ आणे ते ६ आणे दरम्यानच्या साऱ्याची आहे.

एकूण जमिनीमध्ये उत्तमपैकी जमीन एक हजार एकरांचे वर आहे. बागाईत जमीनीचे क्षेत्र २५० २७५ एकरांचे आहे. कोकण भागात भातपिकी जमीन जवळजवळ दोन हजार एकर मिळाली आहे. कोकण भागातील एकूण वाटलेल्या जमिनीचा हा १/६ हिस्सा होतो.

वाटप झालेल्या जमिनीची आजच्या स्थानिक भावाने किंमत ८० लाख रुपयांपर्यंत जाते. इतर

खराब वगैरे जमिनीसह अदमासे एक कोटी रुपये किंमतीची जमीन भूदान- यज्ञात पश्चिम महाराष्ट्रात मिळाली असे म्हणता येईल.

वरील आकडेवारीला असणारा 'मानवी चेहरा' तपासणे आवश्यक आहे. या जमिनीमुळे जे नवीन भूमिधारक तयार झाले त्यांचा तपशील भूदानाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकणारा आहे.[५९] एकूण जमिनीपैकी ४० टक्के जमीन आदिवासी कुटुंबात वाटली आहे, आणि एकूण वाटलेल्या क्षेत्रापैकी या कुटुबांना ३८ टक्के क्षेत्र मिळाले आहे. हरिजन आणि मागासलेल्या वर्गातील ३५ टक्के कुटुंबांना ३४.३ टक्के जमीन मिळालेली आहे. इतर समाजातील २५ टक्के कुटुंबांना २७.७ टक्के जमीन वाटण्यात आली आहे. प्रत्येक आदिवासी कुटुंबाला सरासरी जमीन ४ एकर पडते.हरिजन आणि मागासलेल्या वर्गातील कुटुंबांना मिळालेल्या जमिनीचे सरासरी प्रमाण ४ एकर आणि इतर जमातीतील कुटुंबांना ४,१/२ एकर पडते. एकूण वाटपामध्ये प्रत्येक कुटुंबाच्या मागे सरासरी प्रमाण ४,१/२ एकर पडते. एकूण वाटपामध्ये प्रत्येक कुटुंबाच्या मागे सरासरी प्रमाण ४,१/२ एकरांच्या आसपासच आहे. जमीन मिळालेली सर्वात जास्त कुटुंबे ठाणे जिल्ह्यात आणि त्या खालोखाल रत्नागिरी जिल्ह्यात होती.

धुळे, नाशिक, ठाणे, कुलाबा या जिल्ह्यातून प्रामुख्याने आदिवासींना जमिनी मिळाल्या. ते क्षेत्र १० हजार एकर भरले. इतर ज्या जिल्ह्यात आदिवासींची वस्ती नाही तेथे प्रामुख्याने हरिजनांना आणि मागासलेल्या जमातीतील कुटुंबांना जमीन मिळाली. खालील तक्त्यामध्ये वाटपाचे आकडे मांडले आहेत.

जमीन मिळालेले (कुटुंबसंख्या) ६००१, वाटपक्षेत्र २६,२०७ एकर ३७ गुंठे

| **जमात** | **कुटुंबसंख्या** | **एकूण जमीन मिळालेल्यांशी शे. प्रमाण** | **क्षेत्र एकर-गुंठे** | **एकूण वाटपाशी शे. प्रमाण** |
|---|---|---|---|---|
| १) आदिवासी | २४०० | ४०.० | १०,०९८-२१ | ३८.० |
| २) हरिजन | १३८५ | २३.५ | ५,९९१-२७॥ | २३.० |
| ३) मागासलेल्या वर्गातील | ६८१ | ११.५ | २,८७१-०० | ११.३ |
| ४) इतर वर्गातील | १५३५ | २५.० | ७,२४६-२८॥ | २७.७ |

(आधार - गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १२८.)

भूदानात मिळालेली जमीन हरिजनांना १/३ वाटली जावी असे धोरण होते वरील तक्त्यावरून पाहता हरिजन आणि मागासलेले वर्ग यांना मिळालेल्या जमिनीचे प्रमाण शे. ३४ पडले. असे दिसून येते. या जमिनी वरील वर्गांना ज्यांनी दिल्या त्यांचे वर्गीकरण वेगळ्या पद्धतीने करायचे झाल्यास ते पुढीलप्रमाणे करता येईल. जमिनीच्या संदर्भात दात्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे पडते.[६०]

| दाते | संख्या | एकूण दात्यांशी शे. प्रमाण |
|---|---|---|
| १) ज्यांच्या जमिनीचे वाटप झाले असे दाते | ४६०२ | ५८.० |
| २) न वाटता आलेल्या तुकड्यांचे दाते | १४७४ | १८.० |
| ३) ज्यांच्या जमिनी वाटण्यालायक नव्हत्या असे | ४८० | ६.० |
| ४) मिराशी-हक्काचे[६१] क्षेत्र दिले असे | ३६ | ०.४ |
| ५) एकसाली हक्काचे दान करणारे | ३११ | ४.० |
| ६) ज्यांनी दान दिलेल्या जमिनीची विक्री केली असे | ८४ | १.० |
| ७) दिलेल्या दानाची पूर्तता करण्याची इच्छा नाही म्हणून दान परत घेतलेले | ७२१ | ९.० |
| ८) ज्यांची दानातील जमिनीवर मालकी नाही असे सिद्ध झाले असे | २१३ | २.६ |
| ९) ज्यांच्या जमिनीची कायदेशीर चौकशी चालू आहे असे | ८० | १.० |
| | ८००१ | १००.० |

(आधार - गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ.१२९.)

एकूण दात्यांपैकी ज्यांच्या जमिनीचा शेतीच्या दृष्टीने उपयोग झाला असे ५८ टक्के दाते आहेत शिवाय एकसाली हक्काचे दान करणारे दाते ४ टक्के आहेत. त्यांच्याही जमिनी उपयोगाच्या आहेत परंतु त्यावरील आकड्यात धरल्या नाहीत.

ज्या दात्यांनी आपले दान परत घेतले. दिलेल्या जमिनीची विक्री करून टाकली, स्वतःच्या मालकीचे क्षेत्र दिले नाही, किंवा इतके अल्प दान दिले की ते सर्व परत करणे प्राप्त झाले असे दाते, एकूण दात्यांच्या शे. १९ टक्के भरतात.

वरील प्रमाणे दात्यांची वर्गवारी पश्चिम महाराष्ट्रात आढळली. वरील ९ प्रकारात वर्गवारी केलेली असली तरी या दात्यांची मनोभूमिका तपासणेही आवश्यक आहे.

या दात्यांनी कोणत्या मनोभूमिकेतून दान केले त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

दात्याची मनोभूमिका -:

महाराष्ट्र सेवा संघाने महाराष्ट्रात भू वाटपासाठी जी एकसदस्यीय समिती[६२] नेमली. त्या समितीने त्या समितीने या प्रश्नाचा खोलवर वेध घेतला. समितीने मालेगाव, बागलाण, नांदगाव (जि. नाशिक), हातकणंगले (कोल्हापूर), दक्षिण व उत्तर सोलापूर मोहोळ (सोलापूर) माळशिरस (सोलापूर), इंदापूर, बारामती (पुणे), महाड (कुलाबा), डहाणू (ठाणे), मालवण (रत्नागिरी), शिरोळे (सांगली) व फलटण (सातारा) या तालुक्यांमधील बहुतेक दात्यांना भेटून त्यांची दानामागील भावना-वृत्ती-दृष्टिकोन समजावून घेण्यासाठी एक नमुनावजा पाहणीचा[६३] प्रयत्न केला.

ही पाहणी करताना पुढील पाच मुद्दे ठरविले होते. ज्यांनी दान दिले ते -

१) विनोबाजींचा क्रांती-विचार समजावून घेऊन खरोखर मालकी सोडण्याची तयारी म्हणून दिले.

२) भारतातील धार्मिक परंपरेला अनुसरून, एक सत्कार्य म्हणून दिले.

३) सामाजिक परिस्थितीचे दडपण (Social Compulsion) पडल्यामुळे दिले.

४) लौकिक दृष्टी बाळगून दिले.

५) कुळासंबंधीच्या किंवा भागीदारीसंबंधीच्या सूडबुद्धीने किंवा दुष्टाव्याने दिले? हे तपासण्याचे निकष म्हणून-

१) जमिनीचा कितवा हिस्सा दिला.

२) कोणत्या प्रतीची जमीन दिली.

३) दिल्यानंतर वाटप होई तो त्या जमिनीची व्यवस्था विश्वस्त वृत्तीने लावली का, आणि

४) या कार्यासाठी त्या गावात पुढे सुद्धा सहकार्य करण्याची वृत्ती कितपत आहे.

या गोष्टी निकष म्हणून ठरविल्या होत्या.

समितीला पाहणी अंती पुढील गोष्टी आढळल्या.

१) क्रांतीचा विचार पूर्णपणे समजून घेतला आणि त्याला अनुसरून दान दिले आहे असे दाते शेकडा १०-१२ टक्के आढळतात. त्यांचे मिळालेले दान सहाव्या हिश्श्याचे किंवा त्याहून जास्त हिश्श्याचे होते. राहिलेल्या जमिनीवरील मालकी सोडण्याची त्यांची पूर्ण तयारी होती. त्यामध्ये गरीब आणि मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त भरते.

२) शेकडा ३८ टक्क्यांच्या आसपास असे दाते दिसले की ज्यांना दानामागील विचार पटला होता, परंतु त्यांची प्रेरणा ही धार्मिक दान परंपरेची होती. या विचाराविषयी धार्मिक दृष्टिकोनातून पाहून त्यांचे दान झाले होते. धार्मिक संस्कारामुळे, असे कार्य आपल्या हातून व्हावे, अशीच भावना त्यांना या दानामधून

व्यक्त झाली. अशाप्रकारचे लोक प्रामुख्याने २० एकरांवरील शेतकरी, व्यापारी आणि मध्यम वर्गातले होते.

३) गैरहजर मालक-वर्गातून मिळालेल्या दानामध्ये सामाजिक दडपणाच्या भीतीने दिलेल्या दानाची संख्या साधारणतः ३३ टक्के भरते. त्यात दानासंबंधीच्या पारंपरिक धार्मिक भावनेचाही अंतर्भाव आहे. कायद्याने जमीन जाणारच आहे, मोबदला जो मिळणार तो ही अत्यल्प, तेव्हा दान देऊन भलाई पदरी का न घ्यावी, हा दूरदृष्टीचा विचार किंवा व्यवहार ज्ञान त्यात होते. त्यांनी कुळाकडून दानानंतर खंड वसूल करण्याचा प्रयत्न केला नाही. जेथे कुळांनी नेहमीच्या प्रथेप्रमाणे आपणहून खंड भरला होता, त्यामध्ये काही दाते असे निघाले की, त्यांनी वाटप होईपर्यंत दानाच्या जमिनी कुळाकडे असतानाही जमिनीचा सारा भरला. जो खंड जमा झाला, त्यातील काही भूदान-समितीला दिला किंवा अन्य कार्याला वापरल्याचे त्यांनी दाखवून दिले.

४) काही दात्यांनी अंधश्रद्धेने केवळ भिडेखातर किंवा तोंडदेखलेपणाने दान दिले होते. अशांची संख्या ६ ते ७ टक्के दिसून आली. त्यांनी स्वतःची भरपूर जमीन असून सुद्धा गुंठ्यात मोजता येईल एवढीच जमीन दानात दिली होती. तीही चांगली होती असे नाही. त्यातल्या काही जमिनी कुळांकडे किंवा मालकीसंबंधी गुंतागुंत असलेल्या आढळल्या. दान वाढवून किंवा बदलून देण्याची त्यांची तयारी दिसली नाही. काही दाते असे भेटले की त्यांनी दानपत्रात दाखवलेली जमीन प्रत्यक्षात नव्हतीच. लौकीक दृष्टीने प्रतिष्ठेसाठीच त्यांनी दानपत्र भरले होते.

५) कूळहक्काने ज्यांच्या जमिनी गुंतल्या होत्या, कुळांकडून कसलेच उत्पन्न किंवा खंड बऱ्याच वर्षात ज्यांना मिळाला नव्हता, किंवा इतर काही कारणांमुळे जमिनीच्या बाबतीत वाद होता, मालकी हक्कासंबंधी गुंतागुंत होती, अशा दात्यांनी पुढे कटकटी नकोत. परस्पर निकाल लागावा, विरोधकांच्या पदरात जमीन पडू नये, लौकिक ही पदरात पडावा आणि प्रतिस्पर्ध्याला परस्पर शह देण्याला किंवा त्याचा काटा काढण्याला भूदान हे साधन व्हावे अशा बुद्धीने दान दिलेले होते. अशांची संख्या ७-८ टक्के होईल. मात्र यापैकी काहींच्या जमिनी चांगल्या प्रतीच्या होत्या.

कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणंगले तालुक्यातील दात्यांचा जो परिचय झाला तो देण्यासारखा आहे. त्यावरूनही दात्यांचे मानस कळून येण्याला चांगली मदत होईल, हे दाते लहानलहान जमिनीचे मालक होते.

१) आपल्या गावच्या भूमिहीन शेतकऱ्याला जमीन मिळावी हा विचार त्यांना समजलेला आणि पटलेला होता.

२) त्या दानाची जमीन इतरांना वाटली जावी. ही त्यांची इच्छा होती.

३) शिल्लक राहिलेल्या मालकीचा तुकडा सर्व जमीन गावसमाजाची होत असेल तर अर्पण करण्याची त्यांची तयारी होती.

४) जमीन चांगल्या प्रतीची आहे आणि गुंतागुंत नाही.

५) घरातील बायकामुलांना दानाची कल्पना आणि त्यांच्या दानाला पाठिंबाही आहे.

वरील मनोभूमिका लक्षात घेतल्यानंतर दात्यांच्या उदात्त विचारसरणीचा परिचय आपणास होतो. त्यांनी ज्या जमिनी दानात दिल्या त्यांचा ताबा पाहिला तर आपणास पुढील परिस्थिती आढळते. वाटलेल्या जमिनीच्या दातासंख्येपैकी गैरहजर मालकांची (absentee landlords) संख्या १६३४ म्हणजे शे. ५९ टक्के दिसते. अर्थात या जमिनी कुळांना लावलेल्या होत्या. यापैकी ४९ टक्के दात्यांच्या जमिनी त्यावरील कुळांनाच वाटून दिल्या आणि १० टक्के दात्यांच्या कुळांनी, त्यांना भूदानाचे तत्त्व समजावून दिल्यानंतर खुषीने आपला कुळहक्क भूमिहीनांसाठी सोडून दिला. याला काही अपवाद अर्थात होते. ज्या कुळांनी हक्क सोडला त्यांची संख्या ३३६ होती. कूळहक्काखाली या जमिनी कुळांच्या ताब्यात होत्या. त्यांना जमिनी देण्याचे नाकारण्याचा हक्क होता. या कुळामध्ये ज्यांना दुसरीकडे स्वतःच्या मालकीची १०-१५ एकर जमीन होती अशांनी समजूतदारपणे आपला कूळहक्क आनंदाने सोडला, किंवा तडजोड घडवून, वाटपाचे आणि कबजाचे काम सुलभ केले तर २० एकरांच्यावर इतरत्र मालकी असलेली जी प्रतिष्ठित कुळे त्यात होती. त्यांनी ती जमिनीवरचा कूळहक्क सोडण्यास फार खळखळ केली. भूमिहीनांकरिता हा हक्क सोडणे नैतिक व कायदेशीर दृष्टीने सुद्धा रास्त आहे, हे जाणूनही काही कुळांनी हक्क सोडण्याची तयारी दर्शविली नाही.

स्वतः कसत असलेल्या जमिनीचा हिस्सा दानात देणाऱ्यांची संख्या १३८२ म्हणजे शे. ४१ होती. त्यांच्या जमिनी अर्थात इतर भूमिहीनांना वाटण्यात आल्या.

या पार्श्वभूमीवर आपणास महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाच्या भूदानी क्षेत्राचा, विदर्भाचा [६४] अभ्यास करणे आवश्यक आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील भूदान नंतर आपण विदर्भातील भूदान प्रश्नाकडे वळल्यास पुढील परिस्थिती आपल्या लक्षात येते.

विदर्भातील भूदान[६५]

विदर्भ हा महाराष्ट्राचा एक प्रमुख घटक प्रदेश आहे. विदर्भात अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश होतो. विदर्भात महाराष्ट्र राज्याचा सुमारे ३२ टक्के भूभाग आणि लागवडीखालील असलेल्या जमिनीपैकी सुमारे २७ टक्के क्षेत्र येते. महाराष्ट्रात एकूण १,५०,८०२ एकर भूदान झाले. त्यापैकी सुमारे ७३ टक्के (१, ०९,९८२ एकर) भूदान एकट्या विदर्भात झाले हे उल्लेखनीय आहे. तसेच १९६७ पर्यंत राज्यातील एकूण भू-वितरणापैकी सुमारे ७६ टक्के वितरण विदर्भातच झाले होते.

विदर्भातील भूदान हे १९५१ पासूनच सुरू झाले. १९५४ पर्यंत एकूण ३८,३८१.३१ एकर भूमी प्राप्त झाली. १९६९ मध्ये विदर्भातील एकूण भूदान १,०९,९९९.२७ (एक लाख, नऊ हजार नऊशे नव्व्याण्णव एकर व सत्तावीस गुंठे) इतके झाले. यातील जवळपास २६ हजार एकर जमीन सरकारी नियमांमुळे दात्यांना परत द्यावी लागली. काही जमीन लागवडीस अयोग्य तर काही जमीन आश्वासनापुरती दान करण्यात आली. त्यामुळे अंतिम भूमिदान पुढीलप्रमाणे झाले.

| | | |
|---|---|---|
| १९५१ ते ६९ एकूण भूदान प्राप्ती | - १,०९,९९९.२७ | एकर |
| नामंजूर/लागवड अयोग्य जमीन | - २६,०३१.०४ | एकर |
| आश्वासित परंतु न मिळालेली जमीन | - १,४३२.९० | एकर |
| वाटपासाठी उर्वरित भूदान | - ८२,५३५.३३* | एकर |

उर्वरित भूदान वाटपासाठी ८२,५३५.३३ एकर जागा उपलब्ध असली तरी विदर्भ भूदान मंडळाने १९६९ पर्यंत वितरित जमीन ३८,८६९.४७ एवढीच वाटप केली. यातील फक्त ६,४५९ (सहा हजार चारशे एकोणसाठ) कुटुंबांनाच कायम हक्क मिळाला याची सविस्तर आकडेवारी पुढीलप्रमाणे

**लागवडीचे कायम हक्क मिळालेल्या भूदान-धारकांची जिल्हावार संख्या[६६]**

| जिल्हा | एकूण धारक (संख्या) | कायम हक्क मिळालेले धारक (संख्या) | कायम हक्काखालील जमीन (एकर) |
|---|---|---|---|
| अकोला | ९४७ | ४६७ | २,४११.२२ |
| अमरावती | १,०९८ | २७४ | १,२८७.३० |
| भंडारा | १,३३८ | ८३८ | २,५३७.३५ |
| बुलढाणा | ५७७ | ३०७ | १,५५९.२७ |
| चंद्रपूर | १,३०० | ३८४ | १,४६५.३६ |
| नागपूर | १,२५२ | ६२४ | २,८५५.७० |
| वर्धा | २,८७८ | १,२७० | ६,२२०.०८ |
| यवतमाळ | ५,९२५ | २,२९५ | २०,५३३.१९ |
| एकूण | १५,३१५ | ६,४५९ | ३८,८६९.४७ |

(आधार – नानेकर कृ. र., खांदेवाले श्री. वि., 'विदर्भातील भूदान' पृ. २१.)

विदर्भातील भूदान वितरित करताना १९५३ चा 'मध्यप्रदेश भूदान यज्ञ कायदा'[६७] मार्गदर्शक म्हणून वापरण्यात आला. पश्चिम महाराष्ट्रात भूवितरण करताना वापरण्यात आलेले नियम आणि

विदर्भात भूदान वितरण करताना वापरण्यात आलेले नियम यात फरक होता. या कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे

१) शक्यतोवर एकूण प्राप्त झालेल्या जमिनीपैकी एक तृतीयांश जमीन अनुसूचित जातीमधील भूमिहीनांना देण्यात यावी. -

२) शक्यतोवर अनुसूचित जातीतील दात्यांनी दिलेल्या जमिनी त्यांच्याच जातीतील भूमिहीनांना वाटण्यात यावयात.-

३) शक्यतोवर ज्या गावची जमीन त्याच गावच्या भूमिहीनांमध्ये वाटण्यात यावी. -

४) जमीन वाटताना पुढीलप्रमाणे कमाल मर्यादा ध्यानात ठेवाव्यात.

अ) ओलीत जमीन ... ३ एकर

ब) कोरडवाहू जमीन-

१) धानाची ... ७ एकर

२) कापूस, ज्वारी किंवा गव्हाची --

अ) सपाट ... १० एकर

ब) पठारी ... १५ एकर

क) अति निकृष्ट जमीन ... २० एकर

५) भूदान मंडळाला दिलेली जमीन अवितरित राहत असेल तर ती दात्यांना राहू द्यावी परंतु दात्यांनी त्या जमिनीचा सारा भरून जे शुद्ध उत्पन्न (उत्पन्न लागवड खर्च) राहील ते भूदान मंडळाला हस्तांतरित करावे.

६) दानात मिळालेल्या जमिनीच्या विखुरलेल्या तुकड्यांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न केला जावा.

७) जर एखादी भूमी घेण्याकरिता गावात कोणी भूमिहीन नसेल किंवा जमिनीचे लहान तुकडे स्वतंत्ररीत्या लागवड योग्य नसतील तर त्यांचा शाळा, विहिरी, खतांचे चर इत्यादी सार्वजनिक कार्यांकरिता उपयोग केला जावा.

८) मद्यपी, जुगारी, सट्टेबाज आणि इतर वाईट सवयी असणाऱ्या व्यक्तींना जमीन देण्यात येऊ नये.

वरील मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे कृ. र. नानेकर व श्री. वि. खांदेवाले यांनी विदर्भाचा पद्धतशीर अभ्यास केला. भारतातील एकूण भूदानापैकी महाराष्ट्राचे अंशदान सुमारे ४ टक्के होते. महाराष्ट्रातील ४ टक्के अंशदानापैकी सुमारे ३/४ दान एकट्या विदर्भातून झाले. तर वितरित भूमीचे दान प्राप्त भूमीशी ७१ टक्के प्रमाण भारतात होते. तर महाराष्ट्रात विशेषतः विदर्भात ते ७६ टक्के होते. यामुळे विदर्भातील

भूदानाच अभ्यास हा बराच अंशी महाराष्ट्राच्या भूदानाचा अभ्यास आहे.[६८]

यापूर्वीच आपण विदर्भातील भूदान प्राप्ती व वितरण पाहिले. भूदान चळवळीचा अभ्यास करताना भूदात्याचा हे दान करण्यामागील काय हेतू आहे याविषयी त्यांनी संशोधन केले. त्यांना पुढील हेतू आढळून आले.[६९] यासाठी त्यांनी ९४ दात्यांचा अभ्यास केला.

**दान**

| **क्र.** | **दानाचे कारण** | **दात्यांची संख्या** |
|---|---|---|
| १) | मतप्रणाली पटली | २१ |
| २) | विभूतीप्रभाव | १६ |
| ३) | लागवडीतील अडचणी | ४ |
| ४) | कमाल मर्यादेपेक्षा जास्त जमीन | ८ |
| ५) | नैतिक किंवा सामाजिक दडपण | २८ |
| ६) | भविष्यातील फायद्याची अपेक्षा | १२ |
| ७) | लागवडीतील अडचणी/लागवड अयोग्य जमीन | ४ |
| ८) | आमिष | १ |
| | एकूण | ९४ |

(आधार – नानेकर, पूर्वोक्त, पृ. ७६.)

याच दात्यांचे नव्याने मालक होणाऱ्या लोकांशी काय संबंध होते. याची माहिती दात्यांच्या मानसिकतेवर प्रकाश टाकणारी होती. या संबंधांचे स्वरूप पुढीलप्रमाणे –[७०]

| **क्र.** | **संबंधांचे स्वरूप** | **दात्यांची संख्या** |
|---|---|---|
| १) | कोणतेच संबंध नव्हते | ७९ |
| २) | नातेवाईक | ७ |
| ३) | कूळ | २ |
| ४) | नोकर | ५ |

(आधार – नानेकर, पूर्वोक्त, पृ. ७७.)

याच दात्यांकडून जी प्रश्नावली भरून घेण्यात आली होती त्यात समाजस्थितीचे निदर्शक असणारे काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्याला मिळालेल्या उत्तरांवरून तत्कालिन सामाजिक परिस्थिती लक्षात येते. [७१]

| प्रश्न | | उत्तरे | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | भूदानामुळे भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्यास मदत झाली काय? | ५९ | ३५ |
| २) | भूमी असणारे व नसणारे यांच्यामधील संबंध सुधारण्यात भूदानामुळे मदत झाली काय? | ६१ | ३३ |
| ३) | सामाजिक एकतेची भावना निर्माण होण्यास भूदान साह्यभूत झाले काय? | ३८ | ५६ |
| ४) | जातिभेद, वर्गभेद व इतर सामाजिक तणाव भूदानामुळे कमी झालेत काय? | ३६ | ५८ |

(आधार - नानेकर, पूर्वोक्त, पृ. ७८.)

सामाजिक परिस्थितीनंतर आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतल्यास तत्कालिन कालखंडातील ज्या २०६ नव्याने भूधारक झालेल्या लोकांच्या भेटी नानेकर यांनी घेतल्या तेव्हा पुढील गोष्टींवर प्रकाश पडला. भूदान धारकांना अन्य प्रकारच्या आर्थिक सोयी नसतील तर जमीन विकासासाठी त्यांना खालील गोष्टींवर अवलंबून रहावे लागत होते. [७२]

| **अर्थ सहाय्याच्या सोयी** | **धारक संख्या** |
|---|---|
| काहीच सोय नाही | १२८ |
| सरकारी तकावी | ५ |
| भू-विकास अधिकोष | १५ |
| सावकार | ५० |
| मित्र, नातेवाईक, इत्यादी | ८ |
| एकूण | २०६ |

(आधार - नानेकर, पूर्वोक्त, पृ. ९२.)

भूदान चळवळ सुरू झाल्यानंतर विनोबांनी संपत्तीदान व साधनदान यावर जो भर दिला होता. त्याचे महत्त्व वरील माहितीवरून कळू शकते. चळवळीचे मूल्यमापन करताना नानेकर लिहितात -[७३]

भूदान चळवळीला जे अल्प यश मिळाले आहे त्याची प्रशंसा केली पाहिजे. कारण भारतासारखा एका विशाल अविकसित देशातील एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सोडविण्यासाठी बिनसरकारी पातळीवर आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर केलेला हा प्रयत्न 'न भूतो' असा आहे. परंतु सद्यःस्थितीत शासन

आणि स्वेच्छेने कार्य करणाऱ्या संस्था ह्यांनी एकत्र येऊन भूमिप्रश्नावर एकीकृत उपाययोजना केली पाहिजे.

सरकारने या विचारसरणीला पुष्टी देणारी भूमिका घेतली भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या मते [७४] ''भूमिमालकीवर कमाल मर्यादा लावल्यामुळे मिळणाऱ्या अतिरिक्त जमिनी, शासनाजवळ असलेल्या ओसाड जमिनी [७५] आणि जेथे शक्य असेल तेथे भूदानात मिळालेल्या जमिनी एकत्र करून त्यावर भूमिहीनांचे वसन करण्याच्या शिस्तबद्ध योजना शीघ्र अंमलात आणल्या पाहिजेत.'' नियोजन मंडळाने अशीही महत्त्वाची सूचना केली आहे की 'भूमिहीनांना जमिनी पुरवितांना प्रत्यय आणि इतर सोयी पुरविण्याची काळजी घेतली गेली पाहिजे म्हणजे पुनर्वसन केलेले लोक ह्या जमिनीवर उच्च प्रतीची लागवड करू शकतील.'

(या प्रकरणाचा सारांश आकडेवारीच्या स्वरूपात परिशिष्ट क्र. ६ मध्ये देण्यात आलेला आहे. तो महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका पातळीवरील भू प्राप्ती व भू वितरण दर्शविणारा आहे. सदर आकडेवारी महाराष्ट्र शासनाने विधान सभेतील प्रश्नोत्तरांच्या तासाला लिखित स्वरूपात दिलेली आहे. त्यामुळे तिला अधिकृतता प्राप्त झालेली आहे. सदर आकडेवारी महाराष्ट्रातील कार्याची कल्पना येण्यास पुरेशी आहे. याच्याच जोडीला भूदान मिळविणारे व वितरण करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मुलाखतीही परिशिष्टात जोडलेल्या आहेत.)

*****

# संदर्भ व टीपा

१) गाडगीळ श्री. वि., अभ्यंकर शि. सी., पटवर्धन य. वा 'कूळ व शेतजमीन कायदा' (कसेल त्याची जमीन, दुरुस्त नियम व १९५७ च्या दोन्ही दुरुस्त्यांसह), लॉ बुलेटिन प्रकाशन, पुणे, १९५८, पृ. १६८.

या पुस्तकात भूदान समित्यांच्या संदर्भात पुढील उपयुक्त माहिती दिली आहे.

मुंबई सरकारने १९५७ मध्ये सरकारी गॅझेट भाग ४ व पृ. १३६, ४४८, ५८० व १२५७ या ठिकाणी सरकारमान्य भूदान-समित्यांची यादी प्रसिद्ध केली आहे. बनासकांठा जिल्हा, साबरकांठा जिल्हा, मेहेसाणा जिल्हा, बडोदा जिल्हा, अहमदाबाद जिल्हा, खेडा जिल्हा, थासर तालुका, आनंद तालुका, बोरसद तालुका, मेहमदाबाद तालुका, कापडगंज तालुका, पंचमहाल जिल्हा, भडोच जिल्हा, सुरत जिल्हा, ठाणे जिल्हा, अहमदनगर जिल्हा, पूर्व खानदेश जिल्हा, महाराष्ट्र प्रदेश भूदान यज्ञ समिती, कुलाबा जिल्हा, दक्षिण सातारा, अमरेली जिल्हा, कोल्हापूर जिल्हा, सोलापूर जिल्हा, रत्नागिरी जिल्हा, नाशिक जिल्हा, पश्चिम खानदेश जिल्हा, या ठिकाण च्या भूदान समित्यांना सरकारी मान्यता मिळालेली आहे.

२) साप्ताहिक 'भूदान-यज्ञ' (येथून पुढे 'भू-य' असा उल्लेख केला आहे.)२१-८-१९५२, पृ.३.

३) 'भू-य', १४-८-१९५२, पृ. ३.

४) कित्ता.

महाराष्ट्र सेवा संघाकडे १ लाख एकर जमीन मिळविण्याची जबाबदारी होती. या कामात त्यांना कितपत यश मिळाले, याची पाहणी नागपूर विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील डॉ. कृ. र. नानेकर आणि डॉ. श्री. वि. खांदेवाले यांनी केली. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांनी गांधी जन्मशताब्दी समारोहात पुढाकार घेऊन ही पाहणी करवून घेतली. या दोघांच्या समितीने अत्यंत काटेकोर व शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून पुढील निष्कर्ष काढला. महाराष्ट्रात १९६७ पर्यंत एक लाख सात हजार एकशे अकरा एकर (१०७११) जमिनीचे वाटप करण्यात आले. (संदर्भ, नानेकर कृ. र. खांदेवाले श्री. वि. 'विदर्भातील भूदान', प्रका, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९७०, पृ. १४.) भूदान चळवळीचा असा शास्त्रीय अभ्यास करण्याचा हा महाराष्ट्रातील दुसराच प्रयत्न होता. ही नागपूर विद्यापिठाने गांधी जन्मशताब्दी वर्षात प्रवर्तित केलेली अभ्यास योजना होती. पहिला प्रयत्न भूदान कार्यकर्ते श्री. बाबूलाल गांधी यांनी 'भारतातील भूमिहीन आणि भूदान' या ग्रंथाद्वारे केला. या ग्रंथाला ख्यातनाम *अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची प्रस्तावना आहे. तर खुद्द विनोबांनी 'पुरस्कार' या शीर्षकाखाली*

पुस्तकाचे समीक्षण केले आहे. परंधाम प्रकाशन, पवनार यांनी सदर ग्रंथ १९६२ मध्ये प्रकाशित केला. त्यांच्या अभ्यासानुसार महाराष्ट्रात एक लाख त्रेसष्ठ हजार एकशे सदतीस एकर जमीनीचे वाटप करण्यात आले. (संदर्भ, गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, परिशिष्ट, ३ ते ८.)

या मालिकेतील तिसरा प्रयत्न भूदान-ग्रामदान चळवळीचे अभ्यासक श्री. पराग चोळकर यांनी केला आहे. त्यांनी अभ्यासांती दिलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात एक लाख अठ्ठावन हजार एकशे साठ एकर जमीन भूदानात मिळाली तर एक लाख तेरा हजार दोनशे तीस एकर जमिनीचे वाटप झाले. (संदर्भ, चोलकर पराग, 'सबै भूमि गोपाल की', भूदान ग्रामदान आंदोलन की कहानी, खंड ३, प्रका. गूजरात विद्यापीठ, अहमदाबाद, २०१०.)

यापेक्षा वेगळी माहिती महाराष्ट्र शासनाने १९७० मध्ये विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेली आहे. आष्टीचे आमदार श्री. नि. वि. उगले यांनी भूदान यज्ञामध्ये भूदानापोटी आतापावेतो (१ एप्रिल १९७० पर्यंत) राज्यात तालुकानिहाय किती जमीन मिळाली व त्या जमिनीची विल्हेवाट कशाप्रकारे करण्यात आली? असा प्रश्न विचारला. याला सविस्तर उत्तर श्री. हरी गोविंद वर्तक (मंत्री) यांनी दिले. त्यानुसार भूदान यज्ञात ५४, ५११.८० एकर जमीन मिळाली. त्यापैकी ३९, १३०.७६ एकर जमीन वाटण्यात आली व १५,३८१.०४ एकर जमीन वाटप करायची राहिली आहे.

(संदर्भ - MAHARASHTRA VIDHAN SABHA DEBATES, VOL 32, PT.1., 1971.)
सविस्तर माहिती शेवटी परिशिष्ट क्र. ६ मध्ये दिलेली आहे.

वरील चारही भूदानांचा सरासरी निष्कर्ष काढल्यास सरकारी आकडेवारीनुसार मिळालेली जमीन (५४,५११.८०) व वाटप झालेली जमीन (३९,१३०.७६) ही सर्वात कमी आहे. त्यावर एकमत होण्यास हरकत नाही.

५) धर्माधिकारी भाऊ, 'भू-य', १४-८-१९५४, पृ.४.

येथे जिल्हा तालुकावर माहिती गोळा करताना जमिनीची माहिती गोळा करण्याचे काम (मुद्दा-२) सांगितले आहे, त्यानुसार संदर्भ, गाडगीळ श्री. वि. व अन्य, पूर्वोक्त, पृ. १०.

अ) **जमीन म्हणजे** - शेतीसाठी वापरण्यात येणारी जमीन किंवा अशारीतीने वापरण्यात येत असलेली परंतु पडीक ठेवलेली जमीन आणि तीत अशा जमिनीस लागून असलेल्या आणि शेतावरील इमारतीच्या जागांचा समावेश होतो. यांशिवाय शेतकरी, शेतमजूर किंवा कारागीर यांच्या भोगवट्यात असलेल्या राहत्या घरांच्या जागा व अशा राहत्या घरात लागून असलेली जमीन; शेतकऱ्यांकडून जोडधंद्यासाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींच्या जागा.

ब) Land = ground, earth, as used for farming असा अर्थ 'oxford Advanced Learner's Dictonary of current English' by A. S. Hornby, Pub. by, Oxford University Press, Delhi, 1982, P. 471.

क) Bombay Act LXVII, 1948. (as amended by Bom. Acts XIII, 1956 and XV, 1957.)

a) Land which is used for agricultural purposes (or which is so used but is left fallow, and includes the sites of farm buildings) appurtenant to such land.

i) The Sites of dweliing houses occupied by agriculturists, agricultural labourers or artisans and land appurtenant to such dwelling houses.

II) The Sites of structures used by agricultarists for allied persuits. अधिक तपशीलासाठी, George P. T., 'Terminology in Indian land reforms,' pub, Gokhale Institute of politics and economics, poona-4, 1972, P. 53. अधिक तपशीलासाठी पाहा. याच ठिकाणी भारतभरातील विविध राज्यांच्या 'जमिनीच्या महसुली दृष्टीकोनातून' व्याख्या दिलेल्या आहेत. पृ. ५२,५३,५४.

६) जमीन नसलेल्या लोकांचे प्रमाण (मुद्दा - ३) मोजण्यास सांगितले आहे. जमीन नसलेल्या लोकांचे म्हणजे 'भूमीहीन' या संज्ञेचा अर्थ ज्याने शेतकीच्या कारणांसाठी मालक म्हणून किंवा कूळ म्हणून कोणतीही जमीन धारण केलेली नाही व जो मुख्यतः अंगमेहनतीने आपली उपजीविका करतो, असा अभिप्रेत आहे. संदर्भ, गाडगीळ श्री. वि. व अन्य, पूर्वोक्त, पृ. १० .

७) याच ठिकाणी जिल्हा-तालुकावार माहितीमध्ये 'कूळ' (मुद्दा-७) असा उल्लेख आला आहे. कूळ म्हणजे ज्यांची स्वतःची जमीन नाही व जे दुसऱ्याची जमीन वाहतात व त्यासाठी ते जमीनमालकाला रोख रक्कम व पिकाचा ठराविक हिस्सा अगर अन्य स्वरूपात मोबदला देतात त्यांना कुळ (Tenant) अशी संज्ञा आहे. (संदर्भ - गर्गे स. मा. (संपा.), 'भारतीय समाज विज्ञान कोश', खंड, २, पृ. ४९९.)

८) गैरहजर जमीनमालक याचा अर्थ असा की जे मालक शहरात राहतात, परंतु त्यांच्या गावाकडील शेतावर कुळे किंवा मजूर राबत असतात. ते स्वतः प्रत्यक्ष जमीन कसत नाहीत मात्र दुसऱ्यांकडून कसून घेतात.

९) सरासरी खाते म्हणजे गावातील शेतीचे एकूण क्षेत्रफळ भागिले शेतकरी कुटुंबे असे केले असता येणारी संख्या.

१०) क्षेत्र म्हणजे क्षेत्रफळ.

११) 'भू-य', ११ फेब्रुवारी १९५४, पृ.२

१२) कित्ता.

भूदान कार्यकर्त्यांसाठी नियमावली करताना १/६ जागेचा आग्रह धरण्यात आला होता. त्याचे स्पष्टीकरण विश्वनाथ टंडन यांनी पुढील प्रमाणे दिले आहे. (नियमावली मुद्दा क्र. १)

... When he (Vinoba) was at sagar on Gandhi's birthday, he demanded at the country 50 million acres of land, i. e. one-sixth of the total cultivable area in the country, by 1957, the centenary year of the First war of Indian Independence.

Tandon Vishwanath, 'Acharya Vinoba Bhave,' Publicatons Division India, 1992, P. 54.

१३) 'भूदान यज्ञ' साप्ताहिकाच्या सर्वच अंकामध्ये महाराष्ट्रातील अगदी छोट्यात छोट्या खेडेगावांमध्ये चालवलेल्या शिबिरांची माहिती देण्यात आलेली आहे. प्रकरण ३ मध्ये सर्व शिबिरांची नोंद घेण्यात आलेली आहे.

अधिक तपशीलासाठी पाहा-

'भू-य', १९५२ ते १९५८, उपलब्ध असणारे सर्व अंक.

१४) ७/१२ म्हणजे - प्रत्येक गावचा तलाठी गावातील सर्व जमिनींच्या संदर्भात वेगवेगळ्या नोंदणी वह्या ठेवत असतो. या नोंदणी वह्यांना (रजिस्टर) वेगवेगळे अनुक्रमांक दिलेले असतात. याला गावनमुना म्हणतात. या गावनमुन्यातून आपणास जमिनीचा भूमापन क्रमांक, गावाचे नाव, जमिनीचे क्षेत्रफळ, त्या जमिनीचा भूतकाळ व वर्तमानकाळातील मालकी या विषयी माहिती मिळते. असा गावचा नमुना नंबर ७ आणि गावचा नमुना नंबर १२ हे एकत्र करून त्यातील माहिती सात - बाराच्या रूपात दिली जाते. सबब सात-बाराचा उतारा म्हणजे गाव नमुना नंबर ७ व १२ यांमधील उतारा (एक्सट्रॅक्ट) असतो. म्हणून त्याला ७/१२ चा उतारा म्हणतात. यात गाव नमुना नंबर ७ अ मधील माहिती समाविष्ट असते. यामुळे ७/१२ चा उतारा म्हणजे जमिनीचा आरसा समजला जातो.

१५) धर्माधिकारी भाऊ, जिल्हा समित्यांना सूचना, 'भू-य', २-१०-१९५२, पृ.६.

१६) सर्व्हे नंबर म्हणजे जमिनीची जमाबंदी करतानाचा जमिनीची नेमकी ओळख दाखविणारा क्रमांक.

१७) सरकारी सारा म्हणजे - जमिनीविषयक कर जो वर्षातून एकदा जमीन धारकाने भरणे आवश्यक आहे.

१८) कोरडवाहू म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली शेती.

१९) बागाईत म्हणजे भूगर्भातील किंवा भूपृष्ठावरील खात्रीचे पाणी उपलब्ध (पावसाव्यतिरिक्त) असणारी शेती.

२०) हिस्सेदार म्हणजे जमिनीची मालकी असणारे. उदा. कुटुंब प्रमुखाला वारसा हक्काने शेती मिळाली असेल तर त्याची पत्नी, मुले, नातवंडे हे सगळे 'हिस्सेदार' या संज्ञेत येतात.

२१) कबुलायत म्हणजे जमिनीच्या संदर्भातील लेखी करार.

२२) दखलगिरी म्हणजे दखल देणे.

२३) जमिनीवरचा बोजा म्हणजे जमिनीवरील कर्जे किंवा जमीन गहाण ठेवून घेतलेले कर्ज.

२४) तलाठी म्हणजे महसूली गावाचे जमीन विषयक अभिलेख जतन करणारा, सांभाळणारा, बदलणाऱ्या व बदललेल्या हक्कांची नोंद जमीनविषयक अभिलेखात दाखल करणारा; जमीनविषयक कर, सारा, धारा वसूल करून सरकारी खजिन्यात भरणारा महसूल खात्याच्या रचनेतील सर्वात शेवटचा जबाबदार कर्मचारी. काही ठिकाणी त्याला 'पटवारी' असेही म्हणतात.

२५) विनोबा, 'दहा कलमी कार्यक्रम', 'भू-य', १६-४-१९५३, पृ.१.

२६) फेरवाटणी म्हणजे मूळ मालकाने दान दिलेली जमीन भूहीनाला मालकी हक्काने देणे.

२७) अक्षय संपत्ती दान म्हणजे ज्यांना आपल्या संपत्तीमधून दरवर्षी काही वाटा भूदान चळवळीला दान करता येईल असे करू शकणारे दाते.

२८) विनोबा, 'जमीन वाटणीसंबंधी आवश्यक सूचना', 'भू-य', ३०-६-१९५२, पृ. ३-४.

२९) जमिनीचे ढोबळमानाने पुढील प्रकार मानले गेले आहेत. जिरायत, पड, अर्धबागायत, बागायत, वरकस, खडकाळ

३०) मामलेदार म्हणजे महसूलखात्याने ज्याचे कामाचे क्षेत्र तालुका ठरविले आहे असा महसूली अधिकारी, काही ठिकाणी याला मामलतदारही म्हणतात.

३१) पाटील म्हणजे पूर्वीच्या व्यवस्थेत गावातील रयतेचा जमीनीबाबतचा कर गोळा करणारा व गावातील शांतता व सुव्यवस्था टिकविण्याची जबाबदारी असणारा अधिकारी.

३२) करण अक्षयकुमार, 'जमीन कशी वाटली जाते?' 'भू-य', २-७-१९५३, पृ.१. येथे अधिक

कल्पना यावी म्हणून भारतातील व महाराष्ट्रातील एक प्रातिनिधीक अनुभव दिलेला आहे. त्रिपाठी शिवदास (संघटक, उत्तरप्रदेश भूदान समिती), 'भू-य', २८-१-१९५४, पृ. २-३.

''रायबरेली जिल्ह्याच्या खिरो नावाच्या परगण्याची एकूण लोकसंख्या जवळजवळ ७७००० आहे. या परगण्यांत भूदान यज्ञामध्ये एकूण ३१३९ एकर जमीन मिळाली होती. आम्ही आमच्या १७ दिवसांच्या यात्रेत ३९ गावच्या ७१८ कुटुंबातील ४३०४ व्यक्तींना २५८३.२८ एकर जमीन वाटली.

या जिल्ह्याचे आम्ही तहसील पाडले आणि त्यांचा पूर्ण नकाशा तयार केला. या नकाशात परगणे, प्रत्येक गाव आणि तलाठ्याचे विभाग (बीट) असे वेगळे वेगळे बनविले; ज्या गावी भूदानात जमीन मिळाली आहे त्यावर एक विशेष प्रकारची खूण आम्ही करायचो आणि त्या खुणांवर मग आमचा कार्यक्रम आम्ही आखायचो शक्य तो एक तलाठी विभाग एका दिवसात पूरा करायचा असे साधारणपणे आम्ही ठरविले होतो. सर्व्हेचे वगैरे काम आणि गावच्या अडीअडचणी सर्व समजावून घेऊन जमिनीचे वाटप करायला एका दिवसाला एक मनुष्य पुरेसा होतो. एका मुक्कामी तर चार गावातील जमिनींचे वाटप केले. पण येथे जमीन थोडी थोडी होती आणि तलाठी विभाग एकच होता

आम्ही जमीन वाटपाच्या कार्यक्रमाची सूचना, संपूर्ण माहितीसह सेवापुरी कचेरी, (उ.प्र.भूदान समितीची मुख्य कचेरी ) संबंधित जिल्हाधिकारी, तालुकाधिकारी, प्लॅनिंग ऑफिसर, सर्व राजकीय पक्षांच्या कचेऱ्या आणि जिल्हा बोर्डाचे अध्यक्ष त्यांना देत असू. तालुका अधिकाऱ्यांकडे एक छापील पत्र पाठवून वाटपाचे ठिकाणी तारीख नमूद करून तलाठ्याला आणण्याची व्यवस्था करण्याबाबत विनंती करत असू. अशी सूचना १५ दिवस अगोदर सर्वांकडे आम्ही पाठवायचो म्हणजे कोणाला येण्याची अडचण पडू नये. वाटपाची सूचना प्रत्येक दात्यालाही पत्राद्वारा देऊन त्यावेळी त्यांनाही उपस्थित राहावे अशी विनंती करीत असू. कित्येक दाते वाटणीच्या वेळी हजरही राहिले.

**रोजचा कार्यक्रम**

या यात्रेत आम्ही एकूण सातजण होतो. आम्ही सर्वजण पहाटे ४ वाजता उठून प्रार्थना करून दुसऱ्या मुक्कामी जायला आम्ही निघत असू. तीन-चार मैलांचेच अंतर असल्यामुळे ८ वाजेपर्यंत आम्ही सहज पोहचत असू. गावात जाताच गावात फेरी काढून भूदानाची गाणी, घोषणा देत परत मुक्कामी येऊन एक तास सूत कताई करीत असू. गावची माहिती घेण्यासाठी एक कार्यकर्ता आदल्या दिवशी जाई, त्याने जमवलेली लोकसंख्या, कुटुंबसंख्या, क्षेत्रफळ, भूमिहीन कुटुंबे, उद्योग इ. ची माहिती घेत असू. गावात पोहचल्या बरोबर एक कार्यकर्ता कुटुंबातील माणसांची संख्या, पोटाचे साधन, जमीन आहे की नाही इ. माहिती पुन्हा पुन्हा विचारून लिहून घेई. भूमिहीनांचे चार वर्ग आम्ही बनविले आहेत; पहिल्या वर्गात हरिजन, शेतकरी मजूर, दुसऱ्यांत मागासलेल्या जातीचे शेतकरी मजूर, तिसऱ्यांत वरच्या म्हटल्या

जाणाऱ्या वर्गाचे शेतकरी मजूर, आणि चौथ्या वर्गात ज्यांच्याजवळ थोडीशी जमीन आहे, किंवा जे स्थानिक उद्योग करून पोट भरतात असे म्हणजे सुतार, लोहार, तेली इ.

आमच्यातला चौथा व पाचवा कार्यकर्ता तलाठ्याला आणि सरपंचाला बरोबर घेऊन गावातल्या भूदानात मिळालेल्या जमिनीची पहाणी करी, अशा दृष्टीने की जी जमीन मिळाली आहे ती कशी आहे. किती वाटणीला लायक अशी आहे, किती अयोग्य आहे हे पहात असे. राहिलेले दोन कार्यकर्ते पत्रव्यवहार आणि ऑफिसचे काम पहात. दुपारी १२ पर्यंत काम चालू असतानाच आळीपाळीने आम्ही स्नान, जेवण इ. उरकून घेत असू. २ वाजल्यापासून गावच्या सर्व भूमीहिनांच्या समक्ष ज्यांना जमीन द्यायची अशी माणसे निवडली जात. १/३ जमीन हरिजनांना दिल्यानंतर जी राहिल ती इतरास वाटली जाई. हे काम व्हायला चार तास लागत. मग सामुदायिक प्रार्थना, रामनाम आणि त्यानंतर सर्वांना भूदानासंबंधी समजावून दिले जाई. त्यानंतर ज्यांना जमीन मिळाली त्यांची नावे पुकारली जात आणि त्यांच्या स्वाधीन जमीन केल्याची सनदापत्रे त्यांना दिली जात. हा कार्यक्रम रात्री ११-१२ वाजेपर्यंत चाले.

गावात कुठे कुठे अशी स्थिती बघायला मिळाली की जणू इंग्रजांचे राज्य अजून गेलेलेच नाही.जुन्या जमीनदारांनी गरिबांवर इतके अत्याचार केले आहेत, त्यांना असे काही दडपून टाकले आहे की, जाहीर सभेत येऊन आपले म्हणणे सांगण्याचे त्यांना धैर्यच होत नाही. गावात घराघरांत जाऊन आणि पुन्हा पुन्हा बोलावून जमीन देण्याचा प्रयत्न करावा लागतो. या वातावरणामुळे ज्यांच्याजवळ जमीन अधिक आहे ते तर घाबरून गेले आहेत. सरकारी अधिकारी, तलाठी, सर्वच अधिकारी हे सुद्धा आतून विरोध करतात कारण त्यांना काम तर करावेच लागते पण हात काही 'ओला' होत नाही.

गावात दवंडी देताना, पैसे न घेता जमीन दिली जाईल असे स्पष्ट करून सांगावे लागते. नाहीतर पैशाशिवाय जमीन वाटली जाते, यावर गरिबांचा विश्वासच बसत नाही. अशी दवंडी देऊन आणि पुन्हा पुन्हा सांगून सुद्धा गरीब माणसे स्वतः डोळ्यांनी पहात नाहीत तोवर ती विश्वास ठेवत नाहीत. त्यामुळे त्यांच्या घरी कार्यकर्त्यांना वारंवार पाठवून त्यांना बोलावून आणावे लागते. कुठे कुठे गावातील धेंडे त्यांना भिती घालतात, की, आज तुम्हाला फुकट जमीन देऊन फसवतील, मग जप्ती आणून पैसे वसूल करून घेतील. म्हणून मग, हे सर्व लक्षात घेवून त्यांना सर्व गोष्टी स्पष्ट करून सांगाव्या लागतात. कित्येक ठिकाणी मजुरांना कामावरून सोडतच नाहीत, मग ते येऊन जमिनीची मागणी कशी करणार? त्यामुळे केव्हा केव्हा रात्री बेरात्री येऊन हे लोक आमच्या भोवती जमतात आणि आपल्याला जमीन द्या म्हणतात.

इतक्या सर्व अडचणींच्या परिस्थितीतूनही आम्ही गरिबांना जेव्हा भूदानाच्या चळवळीची हकीकत

आणि महत्त्व सारे समजावून देतो. त्यांच्या हातात सनदा ठेवतो तेव्हा त्यांचा आनंद काय वर्णावा! 'जय विनोबाजीकी' अशी ते गर्जना करतात. त्यांच्या अंत:करणात एक नवा उल्हास उसळतो.''

**दुसरा अनुभव** महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील आहे. ३० जानेवारीच्या मुहूर्तावर अमरावती जिल्ह्यातील देवगावला संस्मरणीय भूमिवितरण समारंभ पार पडला. या ठिकाणी मध्यप्रदेश भूदान समिती व भूवितरण मंडळाचे निष्ठावान सदस्य डॉ. अमर मोरे व त्यांचे थोरले बंधू यांच्या जमिनीचे वितरण करायचे होते. वितरणाची जाहीर सूचना गावकऱ्यांना आगाऊच दिली होती. आसपासच्या गावाचे लोक जमले होते. सात आठ मैल पायी चालत विद्यार्थी- विद्यार्थिनींची पथके काही गावातून पोहोचली होती. विधानसभेचे सदस्य उपस्थित होते. मध्यप्रदेश भूदान समितीचे संयोजक आणि भूदान वितरण मंडळाचे मंत्री श्री दादाभाई नाईक यांनी वितरण समारंभाची पूर्वतयारी करून ठेवली होती.

वितरणाकरिता त्या विशाल सभेत एकामागून एक अर्जदार मागणी करू लागले. डॉ. अमर मोरे उठून जमीनदारांना उद्देशून बोलू लागले, ''माझी इच्छा आहे की देवगावची सारी जमीन देवभूमी होवो. या गावात जमिनीवरील व्यक्तिगत मालकी लुप्त होवो. या गावात ग्रामराज्य स्थापन करण्याच्या दृष्टीने आपण एकेक पाऊल पुढे टाकू या. आम्ही आमच्या जमिनीपासून प्रारंभ करीत आहोत. नंतर ते भूमिहीनांकडे वळून म्हणाले, ही तुमच्या कसोटीची वेळ आहे.तुम्हाला एकमेकांना विरोध करायचा नाही. आपसात सल्ला मसलत करून सर्वमताने सात नावे जाहीर करायची आहेत. असे करण्याने श्रमजीवी लोकांच्या एकीचा श्रीगणेशा सुरू होणार आहे.

या सात नावांपैकी दोन नावे हरिजनांमधून निवडावयाची होती. त्यांनी सर्वानुमते दोन नावे पुढे केली. उरलेल्या अर्जदारातून काहींनी आपली नावे परत घेतली. तरी शेवटी २५-३० नावे शिल्लक राहिलीच. त्यातून आता फक्त पाच नावे आवश्यक होती. म्हणून दुसऱ्यांदा विचार पुढे मांडला. अर्जदारांनी फिरून विचार करण्याचे ठरविले. त्यावेळी माननीय मंडलोईजींनी सुचविले की, 'श्रमजीवी लोकांना आपसांत लढविण्यासाठी हे आंदोलन चालविलेले नाही. परस्पर सहयोग निर्माण करण्याकरिता विनोबांनी हे आंदोलन चालविलेले आहे. एका गरीब माणसाची दुसऱ्या गरीब माणसाशी सहानुभूती व्यक्त करण्याची उत्तम संधी या प्रसंगाने निर्माण केली आहे.' या बोलण्याचा ताबडतोब परिणाम दिसून आला. भूमिहीनांचे एकमत झाले. त्यांनी पाच नावे सुचविली या सातही भूमिपुत्रांचा गौरव करण्यात आला.'' ('भू-य', २५-२-१९५४, पृ.२.)

३३) शेतमजूर म्हणजे - According to Bihar Act xxii, 1956. 'A Person whose main source of livelihood is agriculture or agricultural labour and who does not hold any land or holds land not exceeding such area as may

be prescribed.' (George P. T., Ibid, P. 57.)

३४) गांधी बाबूलाल, 'भारतातील भूमिहीन आणि भूदान,' पवनार, १९६२, पृ. १०५.

३५) कित्ता-पृ. ११०. मूळ मजकूर आकडेवारीच्या सारिणीच्या स्वरूपात आहे. तो समजण्याच्या सोयीसाठी सलग घेतला आहे.

३६) नानेकर कृ. र, खांदेवाले श्री. वि., 'विदर्भातील भूदान' नागपूर, १९७०, पृ. २८. मूळ मजकूर सारिणी व आकडेवारीच्या स्वरूपात आहे. सोयीसाठी तो सलग घेतला आहे.

३७) पोट हिस्सा म्हणजे जमिनीच्या हक्क बदलामुळे, वाटपामुळे, विभाजनामुळे, ताब्यामुळे जमिनीचा पडलेला हिस्सा जो मूळ गटबुकातील नकाशात दाखविलेल्या जमिनीचा भाग.

३८) गावठी नाव म्हणजे त्या- त्या गावातील जमिनीचे स्थानिक नाव. उदा. पाटलांचा मळा, देवाची जमीन.

३९) चालू कब्जेदार म्हणजे चालू वर्तमानकाळात जमीन कसणाऱ्यास चालू कब्जेदार म्हणतात.

४०) गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. २१२-२१३, परिशिष्ट क्र. १.

४१) कित्ता, पृ. १०९-११०.

४२) नानेकर, पूर्वोक्त, पृ. ४२.

४३) गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. ११२ ते ११७.

४४) महालकरी म्हणजे तलाठ्याचे रेकॉर्ड तपासून त्याने दाखल केलेल्या जमीनविषयक नोंदी स्वीकारणारा किंवा नाकारणारा अधिकारी, तलाठ्याच्या वरचा अधिकारी, सध्या त्याला सर्कल किंवा मंडल अधिकारी म्हटले जाते.

४५) Village form VI याला मराठीत गावगाडा पत्रक ६ म्हणतात.

४६) Village form VII याला मराठीत गावनमुना क्रमांक ७ म्हणतात. जमीन विषयक कोणताही हक्कबदल पुरावे तपासून तलाठी आधी गावगाडापत्रक नं ६ (फेरफार) या नोंदवहीत लिहितो व नंतर त्याचा परिणाम गावनमूना क्रमांक ७ मध्ये दिला जातो.

४७) हक्कनोंदणी म्हणजे हक्काच्या प्रकाराप्रमाणे महसूल खात्याच्या अभिलेखात केली जाणारी नोंद म्हणजे हक्क नोंदणी.

४८) सरकारी नोंदणी (रजिस्ट्रेशन व स्टँप ड्यूटी) - मालमत्तेविषयीचे काही करार शासनाच्या जबाबदार अधिकाऱ्यासमोर योग्य ती स्टँपड्यूटी भरून नोंदणीकृत (रजिस्टर्ड) केल्याशिवाय त्या व्यवहारास वैधता प्राप्त होत नाही. त्यामुळे मालमत्तेचे हस्तांतरण पूर्ण होत नाही. या प्रक्रियेस रजिस्ट्रेशन (नोंदणी) म्हणतात.

स्टँपड्यूटी म्हणजे मालमत्तेच्या हस्तांतरण व्यवहाराबाबत शासनाने लावलेला कर.

४९) तुकडेबंदी कायदा- शासनाने निर्धारीत केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण, विभाजन व वाटप करण्यास मनाई करणारा कायदा म्हणजे तुकडेबंदी कायदा. उदा. पुणे जिल्ह्यातील जिराईत १ एकर व बागायत १० गुंठे पेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण, विभागणी व वाटप करणे तुकडेबंदी कायद्याप्रमाणे बेकायदेशीर आहे.

५०) तुकडेजोड कायदा-ज्या गावात 'तुकडेबंदी-तुकडेजोड अधिनियम १९४७' चा अंमल लागू होतो त्या गावात शेतकऱ्यास कसण्यासाठी परवडेल अशा क्षेत्राची शेतजमीन पूर्वी अस्तित्वात असलेले जमिनीचे तुकडे एकमेकास जोडून, एकत्रीकरण योजना राबविली जाते त्यास तुकडेजोड म्हणतात.

५१) गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, ११७-११८

५२) कित्ता, पृ. २१४-१५.

५३) इतर हक्क पत्रक म्हणजे - ७/१२ मधील इतर हक्क या सदरातील नोंदीमध्ये ज्याचा जमिनीशी हितसंबंध निर्माण झाला आहे, पण प्रत्यक्ष ताबा नाही त्यांचा उल्लेख केलेला असतो. उदा. घरातील महिला, बाहेरगावी असलेला पुरुष, बँक किंवा सोसायटीचे गहाणखत तसेच सदर जमिनीबाबतचे व्यवहारात किंवा अन्य प्रकारे निर्माण झालेल्या त्रुटी बेकायदेशीर याबाबतचे शेरे दर्शविलेले असतात.

५४) लोकल सेस म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचा कर.

५५) गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ १२२.

५६) कित्ता, पृ १२३.

५७) कित्ता, पृ १२४.

५८) कित्ता, पृ. १२६-२७.

५९) कित्ता, पृ. १२७-२८.

६०) कित्ता, पृ. १२८-२९.

६१) मिराशी हक्क म्हणजे वंशपरंपरागत व कायम स्वरूपाचे हक्क.

"Mirasia means permanent and hereditary. In some parts of Madras it was found that villages were held permently and hereditarily by a group of families who shared the total area among themselves and

occasionally rotated their holdings among the families to enable each family to hold good, bad and indifferent lands in turn. The Tenure was called mirasi tenure." (George P. T., Ibid, P. 127.)

६२) एकसदस्यीय समिती म्हणजे एकाच व्यक्तीने संपूर्ण कामकाज बघणे. या एकसदस्यीय समिती संदर्भात अधिक तपशील पाहा–

गाडगीळ ध. रा., प्रस्तावना, समाविष्ट, गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १२. गाडगीळ लिहितात ''पुस्तकाचे लेखक श्री. बाबूलाल गांधी यांस महाराष्ट्रांत भूदान समितीने दान मिळालेल्या जमिनींचे वाटप पूर्ण करण्याकरिता सर्वाधिकार देऊन खास नियुक्त केले होते. हे काम त्यांनी जवळ जवळ एकहाती पंधरा महिन्यांत पुरे केले.''

यावरून श्री. गांधी यांचा या विषयावरील अधिकार दिसून येण्यास प्रत्यवाय नाही.

६३) गांधी बाबूलाल, पूर्वोक्त, पृ. १३०-३१.

६४) नानेकर, पूर्वोक्त, पृ १७.

६५) कित्ता, पृ. १९.

६६) कित्ता, पृ. २१.

६७) कित्ता, पृ. २५. सदर भूदान 'मध्यप्रदेश भूदान कायदा १९५३' प्रमाणे झाले. त्याअगोदर सगळ्यात पहिला कायदा हैदराबाद सरकारने १९५३ मध्ये केला. कायद्याचे नाव 'श्री आचार्य भावे सर्वोदय भू-यज्ञ, हैदराबाद लँड रेव्हेन्यू स्पेशल रूल्स १९५१' असे होते. सुरुवातीला हा कायदा फक्त एक वर्षासाठी होता. पुढे त्याची मर्यादा वाढविण्यात आली. या कायद्यान्वये भूदान देऊ इच्छिणाऱ्याने आपण आपली जागा स्वेच्छेने दान देत आहोत असे पत्र स्थानिक तहसीलदाराला द्यावे लागे. तहसीलदार या स्वेच्छापत्राची वा जमिनीच्या राजीनामापत्राची पूर्ण छाननी करून त्या जागेवर सरकारी कर वा अन्य कोणत्याही प्रकारचे येणे नसेल तरच 'भूदान' मान्य केले जाई. सदर जमीन सरकारजमा करून घेऊन मग वाटप करण्याची वा नाकारण्याची (सरकारच्या मर्जीने) सरकारची योजना होती. विनोबा याला अनुकूल नव्हते. त्यामुळे सरकारने विनोबांच्या आदराप्रित्यर्थ ही कल्पना रद्द करून विनोबांच्या द्वारा नेमलेल्या भूदान समितीला वितरणाचे अधिकार दिले. जमीन हस्तांतरणासाठी स्टॅम्प फी व रजिस्ट्रेशन फी माफ करण्यात आली होती.

१९५२ मध्ये उत्तरप्रदेशात, १९५३ मध्ये सौराष्ट्र, ओरिसा, मध्यप्रदेश; १९५४ मध्ये बिहार, राजस्थान, हिमाचल प्रदेशात 'भूदान कायदे' झाले. १९५६ पर्यंत भारतातील सर्वच राज्यात

सदर कायदा झाला. भारतभरातील सर्वच कायद्यांमध्ये एक समान तरतूद अशी होती की भूदान साठी 'भूदान बोर्ड वा समिती' नेमणे आवश्यक आहे. समिती वा बोर्ड नेमण्याचा अधिकार विनोबांना देण्यात आला होता. विनोबांचा सल्ला किंवा संमती घेतल्याशिवाय समिती अस्तित्वात येऊ शकत नव्हती. जानेवारी १९६७ मध्ये विनोबांनी हा अधिकार सर्व सेवा संघाला दिला. यामुळे भूदान बोर्ड राजकारणापासून अलिप्त राहिली.

या विषयीचे अधिक तपशीलासाठी पहा-

चोलकर पराग, पूर्वोक्त, खंड १, पृ. १ ते ३१.

६८) नानेकर, पूर्वोक्त, प्रस्तावना, पृ. सात, पृ. ९९.

६९) कित्ता, पृ. ७६.

७०) कित्ता, पृ. ७७.

७१) कित्ता, पृ. ७८.

७२) कित्ता, पृ. ९२.

७३) कित्ता, पृ. १०४.

७४) कित्ता.

७५) शासकीय ओसाड जमीनी, पडीक जमिनी सरकारी नियमांच्या अधीन राहून वितरीत करता येऊ शकतात. असा सरकारी नियमच आहे. परंतु नियमांविषयीचे अज्ञान आजही असल्यामुळे लोक त्याचा फारसा फायदा घेऊ शकत नाही. परंतु, पुण्यातील जमीनविषयक एक कार्यकर्ते श्री. सतिश मुकुंद जोशी यांनी सरकारी नियमांच्या अधिन राहून पूढील जमीन वितरीत केली.

**१९९६ मधील वितरण** - महाराष्ट्रात विशेषतः १९७५ ते ७७ या काळात आणि त्या आधी सुद्धा वन व महसूल खात्याकडे असलेली पडीक जमीन भूमीहीन, धरण व प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक अशा घटकांना देण्याचा कार्यक्रम महाराष्ट्रात शासनातर्फे राबविला जात असे. १९७५ ते ७७ या काळात, ज्या काळाला आचार्य विनोबा भावे यांनी 'अनुशासन पर्व' म्हटले त्या काळात अशी जमीन वाटपाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात राबविण्यात आला.

महसूल खाते हे राज्यशासनाचे सर्वात महत्त्वाचे खाते आहे. अन्य खात्यांना सुद्धा महसूल खात्यावर अनेक बाबतीत अवलंबून रहावे लागते. महसूल खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांची कर्तव्ये खात्याने घालून दिलेल्या प्रक्रियेप्रमाणे अमलात आणली, तर शासनाने ठरविलेली उद्दिष्ट्ये ठरविलेल्या काळात पूर्ण करणे शक्य असते. महसूल खात्याच्या या कार्यक्षमतेचा फायदा

सामान्य जनास होतो आणि त्याचे श्रेय सत्ताधारी पक्षास आपोआप मिळते.

वर उल्लेख केलेल्या दुर्बल घटकांना सरकारी पडीक जमिनी वाटपाचा कार्यक्रम अमलात आणताना महसूल खात्याच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी जमीन वाटपाचे महत्त्वाचे काम १) जमीन वाटप करण्याचे तांत्रिक अंग लक्षात न घेता २) भूमी अभिलेखात योग्य त्या नोंदी वेळेवर न करता ३) लाभधारकाला विश्वासात न घेता केल्यामुळे अनुशासन पर्वात सुद्धा जमीन वाटपाच्या या कार्यक्रमात अनागोंदी, बेपर्वाई आणि खऱ्या गरजूंना जमीन न मिळणे याचे दर्शन घडणारी ठरली. अशी हजारो प्रकरणे महाराष्ट्रात आजही आहेत. अनेक भूमीहीनांना मोठ्या जमीनदाराकडील वरकड (सरप्लस) आणि सरकारी पडीक जमीन वाटपाचा कार्यक्रम कागदोपत्री पूर्ण करण्यात आला आहे. अनेक प्रकरणात वाटप केलेल्या जमिनीचा प्रत्यक्ष ताबा भूमीहीन व दुर्बल घटकातील लाभधारकांना अद्याप मिळालेला नाही.

अशाच एका प्रकरणात श्री. बारावकर मास्तर हे जमीन प्रकरणात बाधित होते. त्यांनी जानेवारी १९९६ मध्ये श्री. सतिश जोशी (कार्याध्यक्ष, भूमी मुक्ती संघटना, पुणे जिल्हा) यांची भेट घेतली. श्री. बारावकर यांनी सांगितले, 'आम्हाला १९७८ मध्ये तहसीलकचेरीवर बोलावून जमीन वाटप केल्याचे सांगण्यात आले. आमच्यातील काही जणांना सातबारा उतारा देण्यात आला पण हद्द व निशाण्या दाखवून आवश्यक असेल तेथे मोजणी करून आमच्याकडून ताबेपावती लिहून घेऊन आम्हाला जमीन प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीसाठी देण्यात आली नाही.' या गोष्टीस आज १७ वर्षे झालेली आहेत.

अशा प्रकारचे प्रकरण सतिश जोशी यांच्यासाठी नवीनच होते. त्यांनी श्री. बारावकर मास्तरांना काही कागदोपत्री पुरावा आहे का? असे विचारले. बारावकर मास्तरांनी श्री. जोशी यांच्या समोर एक फेरफार ठेवला. या फेरफार उताऱ्यामध्ये जमीन वाटपाचा दिनांक २१-५-१९७८, गावाचे नाव मिरगलवाडी, सज्जा दौंड, सर्व्हे क्र. ३९२ यामधील ३३ (तेहेतीस) दुर्बल घटकांना वाटप केलेले हिस्से नंबर आणि त्यांची नावे असा भक्कम पुरावा होता.

(फेरफार उतारा हा जमिनीच्या हस्तांतरणाची नोंद ठेवणारा महसूल खात्यातील महत्त्वाचा अभिलेख आहे. हस्तांतरणाचा पुरावा समोर आला की त्या पुराव्याची सत्यता तपासली जाते. त्यानंतर हस्तांतरणाची नोंद प्रथम गावनमुना ६ म्हणजेच फेरफार पत्रकात केली जाते. त्यानंतर त्याचा अंमल परिणाम सात बारा उताऱ्यावर दिला जातो.)

श्री. सतिश जोशी यांनी त्यांचे मार्गदर्शक श्री. रा. वि. भुस्कुटे (निवृत्त तहसीलदार) यांना या प्रकरणात सल्ला विचारला. श्री. भुस्कुटे यांनी चिकाटी आणि सातत्य अवलंबिल्यास यश निश्चित आहे, (Go ahead), असा सल्ला दिला. त्यानंतर क्रमाने आंदोलनाचे विविध प्रकार हाताळत हे प्रकरण

तडीस नेण्यासाठी श्री. सतिश जोशी यांनी सहकाऱ्यांची एक सभा बोलविली. त्यांना प्रश्नाचे स्वरूप समजावून सांगितले त्यावर सर्वांनी सतिश जोशी यांना असे सांगितले की या प्रकरणात आपण जेव्हा बोलवाल तेव्हा आम्ही मोर्चा, निदर्शने यात सामील होऊ. हा शब्द सर्वांनी शेवटपर्यंत पाळला.

त्यानंतर या प्रकरणातील आठ भूमीहीन शेतमजूर आणि भूमी मुक्ती संघटनेचे अन्य सभासद अशा १४०० कार्यकर्त्यांनी ३ जानेवरी १९९६ रोजी जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा नेऊन जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधले. नंतर १ महिना तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे कडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही म्हणून श्री. सतिश जोशी व सहकाऱ्यांनी ७ फेब्रुवारी १९९६ पासून जिल्हाधिकारी कचेरीसमोर बेमुदत उपोषण सुरू केले. सलग आठ दिवस उपोषण झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी चर्चेला बोलाविले आणि सदर प्रश्न सोडविण्याचे तोंडी आश्वासन दिले. मुख्यमंत्री यांचे कडे लेखी निवेदन पाठविण्यात आले. २६ जून १९९६ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. विजय माथनकर यांना दि. १ जुलै रोजी त्यांच्या कचेरीत प्रवेश करून सत्याग्रह करून अटक स्वीकारण्याची नोटिस श्री. सतिश जोशी यांनी दिली. दिलेल्या नोटिशीप्रमाणे श्री. सतिश जोशी व त्यांचे आठ सहकारी जिल्हाधिकारी यांच्या दालनात अटक करून घेण्यासाठी शिरले. जिल्हाधिकारी श्री. माथनकर यांनी तडजोडीची भूमिका घेऊन आधीच तयारी केली होती. त्यामुळे सत्याग्रहींना अटक झाली नाही. दौंड तालुक्याचे तत्कालीन तहसीलदार श्री ज्ञानदेव ठुबे आणि उपविभागीय अधिकारी श्री. शेखर गायकवाड यांचे संपूर्ण सहकार्य हा प्रश्न सोडविण्यासाठी मिळेल या पुढे हे प्रकरण पूर्णपणे निकाली निघेल. म्हणजेच संबंधित भूमीहीनांना हद्द व निशाण्या दाखवून मोजणी करून संबंधित जमिनीचा ताबा देण्यात येईल असे आश्वासन दिले. श्री. सतिश जोशी यांची टेलिफोनवर वरिल दोघांशी चर्चा घडवून आणण्यात आली.

दुसरे दिवशी सकाळी दौंड येथे श्री. ज्ञानदेव ठुबे, तहसीलदार यांची श्री. सतिश जोशी यांनी आठ भूमीहीनांसह भेट घेतली. त्यावेळी संबंधित गावाचे कामगारतलाठी श्री. खोमणे यांनी निदर्शनास आणून दिले की हे प्रकरण फक्त आठ भूमीहीनांचे नाही तर जमीन वाटप केलेल्या १२८ भूमीहीन कुटुंबांचे आहे. वाटप योग्य क्षेत्र २२७ हेक्टर चौदा आर (५६७.८५ एकर) इतके आहे. श्री. ज्ञानदेव ठुबे यांनी या ८ भूमीहीनांना जमिनीचा ताबा देण्याची लगेच तयारी दर्शविली. शासकीय वाहनातून हे भूमीहीन सदर जमीन पाहून आले, पण जमीन चुना फुटलेली होती. श्री. जोशी आणि कार्यकर्त्यांनी असे ठरविले की ५६७ एकर जमीन १२८ कुटुंबांना हद्द व निशाण्या दाखवून प्रत्यक्ष ताबा मिळेपर्यंत संबंधित प्रकरणाचा पाठपुरावा करायचा, काम सोडून द्यायचे नाही. (२ जुलै १९९६)

या नंतर दर महिना दर दहा दिवसांनी संबंधित प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करून मार्च १९९७ अखेरपर्यंत १२८ कुटुंबांना वर निर्देश केलेल्या जमिनीचे हद्द व निशाण्या दाखवून, देय जमीन

प्रत्यक्ष मोजून पोटखराबा जमीन वगळून, अंतर्गत फाळणी नकाशे तयार करून, नव्या गट क्रमांका प्रमाणे सातबारा तयार करून हे काम पूर्ण करण्यात आले. भाऊसाहेब नगर येथे राहणारे बारा भूमीहीन या सर्व प्रक्रियेचे साक्षीदार आहेत. उर्वरीत ११६ कुटुंबांना १७ वर्षानंतर या जमिनीचा ताबा कोणामुळे मिळाला हे माहित नाही.

संबंधित जमिनीची मोजणी करून चांगली जमीन भूमीहीनांना देऊन वाटपातून पोटखराबा जमीन वगळणे या कामी त्यावेळचे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांनी प्रथम फारसा रस दाखविला नाही. नंतर हळूहळू आपल्या कर्तव्यात प्रगती दाखविली व काम उत्साहाने पूर्ण केले. याचे कारण भूमीमुक्ती संघटनेचे कार्यकर्ते आर्थिक लाभाचे उद्दिष्ट्य ठेऊन काम करीत नाहीत हे त्यांच्या लक्षात आले होते. तसेच श्री. विजय माथनकर, जिल्हाधिकारी पुणे यांनी त्यांच्या अधिकाराचा उपयोग करून जमीन मोजणी करण्याची फी सरकारी खजिन्यातून भरली.

शासनाची इच्छाशक्ती, लोकांची चिकाटी, कायद्यांचे सखोल ज्ञान एकत्र आल्यास काय होऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे. सरकारी नियमांच्या अधीन राहून भूदान कसे करता येऊ शकते हे श्री. सतिश जोशी यांनी दाखवून दिले आहे. भूदान चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हा पथदर्शी प्रकल्प आहे.

याचाच अर्थ असा की भूदान चळवळ आजही कालविसंगत ठरलेली नाही. उलट २१ व्या शतकात या चळवळीची यथार्थता कायमच आहे.

(आधार - श्री. सतिश जोशी यांची २०-५-२०११ रोजी घेतलेली मुलाखत)

*****

